आनंद सागर मंगल कार्यालय
शाकाहारी करिता
एका मंगलमय कार्यासाठी लागणारी सर्व प्रकारची सेवा एकाच छताखाली. आता आनंद सागर मंगल कार्यालय येथे रात्रीच्या कार्यक्रमासाठी भव्य लॉन्स उपलब्ध.
* लग्न सोहळा * साखरपूडा * रिसेप्शन * वाढदिवस
* गेट टुगेदर * कॉन्फरन्स * सांस्कृतिक कार्यक्रम
आसना बायपास चौरस्ता, गोरक्षण, जवळ, देशमुख गॅस पंपासमोर कामठा (बु.) नांदेड
व्यवस्था: स्वागत मंडप डेकोरेटर्स, मो. 9325610507,7972904719



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com



हॉटेल द्वारका
शुध्द शाकाहारी फॅमिली रेस्टॉरंट
सौ. प्रियंका महेश वडजकर 7620987408
कोकाटे कॉम्प्लेक्स, आसना बायपास, सांगवी (बु.) हिंगोली रोड, नांदेड.



* वर्ष ६५ वे * अंक १२३ * नांदेड * रविवार, दि. १० मे २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# नांदेडसह राज्यात १४ ते २० मेदरम्यान मुसळधार पावसाची शक्यता



**मुंबई/नांदेड (प्रतिनिधी)** – राज्यात दुहेरी हवामानाचं चित्र आहे. एकाबाजूला हैराण करून सोडणारा उकाडा तर दुसऱ्या बाजूला मुसळधार पाऊस. राज्यात पुढील आठवड्यात १४ मे ते २० मे या कालावधीत नांदेडसह राज्यात मुसळधार पावसाची शक्यता आहे. मान्सूनपूर्व पावसाचा तडाखा राज्याला बसेल. या आठवड्याच्या अखेरीस काही भागात पावसाचे आगमन झाले असून तर पुढील आठवड्यात इतर भागात मुसळधार पाऊस राज्याला झोडपून काढण्याची शक्यता आहे.

हवामान विभागानुसार, कोकण क्षेत्रातील पालघर, ठाणे, मुंबई, रायगड आणि रत्नागिरी या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट असून जिल्ह्यात काही ठिकाणी उष्ण वारे वाहतील. सिंधुदुर्ग जिल्ह्यासह रत्नागिरीत हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडेल. तर विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया आणि यवतमाळ जिल्ह्यातील काही भागात सोसाट्याचा वाऱ्यासह मुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज आहे.

हवामान विभागाने धाराशिव आणि लातूर जिल्ह्यातील काही पट्ट्यात गारपिटीचा अंदाज वर्तवला आहे. नांदेड, हिंगोली आणि परभणी जिल्ह्यात हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडेल. मध्य महाराष्ट्र, सोलापूर जिल्ह्यात वेगवान वारे वाहतील. विजांचा कडकडाट होईल. तर गारपीट होण्याचीही शक्यता आहे.

रत्नागिरी मध्ये सलग तिसऱ्या दिवशी अवकाळीचे सावट आहे. संगमेश्वर तालुक्यात सलग तिसऱ्या दिवशी पावसाची जोरदार हजेरी लागली. संगमेश्वर बाजारपेठ परिसरातील रस्ते–नाले पावसाने तुडुंब भरले आहे. संगमेश्वर बाजारपेठेमध्ये अचानक आलेल्या पावसामुळे व्यावसायिक व नागरिकांची तारांबळ उडाली.

## शरद पवार यांची रयत शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदी फेरनिवड

**मुंबई (प्रतिनिधी)**– रयत शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदी शरद पवार यांची पुन्हा एकदा वर्णी लागली असून सन २०२६ ते २०२९ या तीन वर्षांच्या कालावधीसाठी शरद पवार हेच रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष असणार आहेत. त्याच पार्श्वभूमीवर आज त्यांनी रयत शिक्षण संस्थेतील कार्यक्रमास हजेरी लावत भाषण केलं.

रयत शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदाच्या निवडी दरम्यान अध्यक्ष पदासाठी एकच अर्ज आल्यामुळे शरद पवार यांची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी बोलताना शरद पवार म्हणाले की, आपण कुठं कमी पडलो, नवीन काय करता येईल याबाबत आपण विचार करायला हवा. सर्वसामान्य लोकांसाठी कर्मवीरांनी आदर्श दिला, तोच आदर्श आम्ही पुढे नेण्याचा प्रयत्न करत आहोत. संस्थेसाठी अखंड काम करणारे आहेत, म्हणून आज संस्थेची उंची वाढली आहे. सर्व सेवकांचे मी अंतःकरणापासून आभार मानतो.

# पेपर फुटीप्रकरणी संबंधित महाविद्यालयाला १० लाखांचा दंड

## स्वारातीम विद्यापीठाचा निर्णय

**नांदेड (प्रतिनिधी)**– स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या उन्हाळी–२०२६ परीक्षेदरम्यान घडलेल्या पेपर फुटी प्रकरणात विद्यापीठ प्रशासनाने अत्यंत कठोर भूमिका घेत संबंधित दोषी महाविद्यालयावर १० लाख रुपयांचा आर्थिक दंड ठोठावला आहे. या कारवाईमुळे शैक्षणिक वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.



उन्हाळी–२०२६ सत्राच्या परीक्षा सुरू असताना बी. फार्मसी अभ्यासक्रमाच्या एका विषयाची प्रश्नपत्रिका परीक्षेपूर्वीच सोशल मीडियावर, विशेषतः व्हॉट्सपवर व्हायरल झाल्याचे विद्यापीठाच्या निदर्शनास आले होते. या गंभीर प्रकाराची दखल घेत कुलगुरु डॉ. मनोहर चासकर यांच्या आदेशानुसार उच्चस्तरीय चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. समितीने सादर केलेल्या अहवालात संबंधित महाविद्यालयाची निष्काळजीपणा व जबाबदारी स्पष्ट झाल्याचे समोर आले आहे.

या पार्श्वभूमीवर दि. ९ मे, २०२६ रोजी परीक्षा व मूल्यमापन मंडळाची तातडीची बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीत विषयाचे गांभीर्य, विद्यापीठाची झालेली बदनामी आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा विचार करून महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.

बैठकीत संबंधित महाविद्यालयावर १० लाख रुपयांचा आर्थिक दंड आकारण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच शैक्षणिक वर्ष २०२६–२०२७ मधील प्रवेश प्रक्रिया का रद्द करण्यात येऊ नये, याबाबत सात दिवसांच्या आत खुलासा सादर करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. दरम्यान, पेपर फुटीच्या दिवशी घेण्यात आलेली संबंधित विषयाची परीक्षा विद्यापीठाने यापूर्वीच रद्द केली आहे.

यासंदर्भात परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे यांनी सांगितले की, विद्यापीठाने घेतलेल्या या कठोर भूमिकेमुळे भविष्यात अशा गैरप्रकारांना निश्चितच आळा बसेल. विद्यापीठाच्या या धाडसी कारवाईमुळे परीक्षा प्रक्रियेत गैरप्रकार करणाऱ्या संस्था आणि कॉपी बहाद्दरांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, शैक्षणिक क्षेत्रात पारदर्शकता व शिस्त राखण्यासाठी हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

## मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात पंजाबचे उद्योग मंत्री संजीव अरोरा ईडीच्या ताब्यात

**अमृतसर (प्रतिनिधी)**– अंमलबजावणी संचालनालयाने म्हणजेच ईडीने आज शनिवार, ९ मे रोजी पंजाबचे वीज, उद्योग तसेच गुंतवणूक प्रोत्साहन मंत्री संजीव अरोरा यांना कथित मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात ताब्यात घेतले आहे.

ईडीच्या पथकांनी सकाळपासूनच चंदीगड, पंजाब, दिल्ली आणि गुरुग्राम येथील त्यांच्या निवासस्थानांवर आणि आस्थापनांवर छापेमारी केली. माहितीनुसार, चंदीगडच्या सेक्टर–२ येथील सरकारी निवासस्थानी अनेक तास चाललेल्या झडतीनंतर ईडी अधिकाऱ्यांनी अरोरा यांना ताब्यात घेतले. कारवाईदरम्यान सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आणि चंदीगड पोलिसांनी मंत्री निवासस्थानाकडे जाणारे सर्व मार्ग बंद केले.

दरम्यान, परकीय चलन उल्लंघन आणि फसव्या निर्यातीच्या कथित प्रकरणात, अंमलबारी संचालनालयाने (ईडी) हॅम्पटन स्काय रियल्टी लिमिटेड आणि पंजाबचे उद्योगमंत्री संजीव अरोरा यांच्याशी संबंधित संस्थांची बँक खाती आणि स्थावर मालमत्ता तात्पुरती जप्त केली आहे. ही कारवाई १५७.१२ कोटी रुपयांच्या कथित फसव्या निर्यातीशी संबंधित आहे.

## तीन दिवसांच्या नाट्यमय वळणानंतर थलपती विजय आज मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार



**चैन्नई (प्रतिनिधी)**– तामिळनाडूमध्ये, टीव्हीकेचे प्रमुख सी. जोसेफ विजय आज दि. १० मे रोजी राज्याचे नववे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतील. नवीन सरकारचा शपथविधी सोहळा चेन्नई येथील जवाहरलाल नेहरू इनडोअर स्टेडियममध्ये सकाळी १० वाजता सुरू होईल. विजय यांनी लोक भवन येथे राज्यपाल राजेंद्र विश्वनाथ अर्लेकर यांची भेट घेतली आणि सरकार स्थापन करण्यासाठी १२१ आमदारांची पाठिंब्याची पत्रे सादर केली. बहुमत सिद्ध करण्यासाठी ११८ आमदारांच्या बहुमताची आवश्यकता होती. १३ मे रोजी विधानसभेत बहुमत सिद्ध करावं लागेल.

विजय यांच्या पक्षाने सर्वाधिक १०८ जागा मिळवल्या होत्या, परंतु बहुमतासाठी त्यांना १० जागा कमी पडल्या. ८ मे पर्यंत, टीव्हीकेने काँग्रेसच्या पाच आमदारांचा आणि सीपीआय व सीपीआय(एम)च्या प्रत्येकी दोन आमदारांचा पाठिंबा मिळवला होता. शनिवारी व्हीसीके आणि आययूएमएलने प्रत्येकी दोन आमदारांसह टीव्हीकेला आपला पाठिंबा दर्शवला. महाबलीपुरम येथील फोर पॉइंट्स रिसॉर्टबाहेर कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे, जिथे टीव्हीकेचे सर्व आमदार थांबले आहेत.

## शरद पवार गटाचे प्रवक्ते विकास लवांडेंवर शाईफेक

**मुंबई (प्रतिनिधी)**– राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रवक्ते विकास लवांडे यांच्यावर किर्तनकार संग्राम भंडारे आणि त्यांच्या साथीदारांकडून शाईफेक करण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. आळंदी मातोबाची, तालुका हवेली येथे शनिवारी सकाळी दहाच्या सुमारास ही घटना घडली. भंडारे आणि १० ते १५ गुंड गोरक्षकांनी गाडी अडवून अंगावर शाई ओतली आणि धक्काबुक्की करुन पिस्तूल दाखवली, असा आरोप राष्ट्रवादीचे नेते लवांडे यांनी केला आहे.

## निवृत्त लेफ्टनंट जनरल एन. एस. राजा सुब्रमणी हे देशाचे तिसरे चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)**– निवृत्त लेफ्टनंट जनरल एन. एस. राजा सुब्रमणी हे देशाचे पुढील संरक्षण प्रमुख असतील. केंद्र सरकारने सोमवारी ही घोषणा केली. सुब्रमणी यांच्याकडे संरक्षण व्यवहार विभागाच्या सचिवपदाची जबाबदारीही असेल. सरकारने व्हाईस डमिरल कृष्ण स्वामिनाथन यांची पुढील नौदल प्रमुख म्हणून नियुक्ती केली आहे. दोघेही ३१ मे रोजी पदभार स्वीकारतील. सध्याचे संरक्षण प्रमुख अनिल चौहान यांचा कार्यकाळ ३० मे रोजी संपेल. एन. एस. राजा सुब्रमणी हे देशाचे तिसरे संरक्षण प्रमुख असतील.



एन. एस. राजा सुब्रमणी हे डिसेंबर १९८५ मध्ये गढवाल रायफल्समधून सैन्यात अधिकारी म्हणून दाखल झाले. त्यांनी राष्ट्रीय संरक्षण अकादमी (एनडीए) मधून लष्करी प्रशिक्षण घेतले. त्यानंतर त्यांनी यूकेमधील ब्रॅकनेल येथील जॉइंट सर्व्हिसेस कमांड अँड स्टाफ कॉलेजमध्ये शिक्षण घेतले. भारतात परतल्यानंतर, त्यांच्याकडे एका माउंटेन ब्रिगेडमध्ये ब्रिगेड मेजर पदाची जबाबदारी देण्यात आली. नंतर त्यांनी दिल्लीतील राष्ट्रीय संरक्षण महाविद्यालयात शिक्षण घेतले.


रामबाण ईलाज
वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.
:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड –९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१
तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308


## भारतीय वन सेवा परीक्षेत निखिल जोशी राज्यात प्रथम

**नांदेड (प्रतिनिधी)**– केंद्रीय लोकसेवा आयोगाने भारतीय वन सेवा परीक्षा २०२५ चा अंतिम निकाल जाहीर झाला आहे. यात नांदेडच्या निखिल लक्ष्मणराव जोशी यांनी देशात बारावा तर महाराष्ट्रात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होत घवघवीत यश मिळविले आहे.



आयएएस व आयपीएस दर्जाच्या आयएफएस ही तिसरी ऑल इंडिया सर्व्हिस म्हणून गणली जाते. पूर्व परीक्षा २५ मे २०२५ रोजी घेण्यात आली. लेखी परीक्षा १६ ते २३ नोव्हेंबर दरम्यान झाली. लेखी परीक्षेत यशस्वी उमेदवारांना व्यक्तिमत्त्व चाचणीसाठी बोलावण्यात आले. मुलाखत प्रक्रिया ६ ते १५ एप्रिल २०२६ कालावधीत झाली. लेखी परीक्षा व मुलाखतीतील गुणांच्या आधारे अंतिम गुणवत्ता यादी तयार करण्यात आली. नुकताच परीक्षेचा अंतिम निकाल जाहीर झाला. यात यात निखिल जोशी यांनी देशात बारावा क्रमांक तर महाराष्ट्रात प्रथम क्रमांक मिळवला आहे. निखिल जोशी आता आयएएस व आयपीएस सारखेच आयएफएस अधिकारी होणार असल्याने पर्यावरण संरक्षण, वनसंपत्तीचे संवर्धन आणि जैवविविधतेचे रक्षण यावर काम करतील. या उतुंग यशा बद्धल निखिल जोशी यांचे भाजपा प्रदेश उपाध्यक्ष चैतन्यबापू देशमुखसह अनेकांनी अभिनंदन करीत पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

## शुभेंदू अधिकारी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्रिपदी विराजमान


**कोलकाता (प्रतिनिधी)**– भारतीय जनता पक्षाचे नेते शुभेंदू अधिकारी यांनी शनिवारी पश्चिम बंगाल राज्याच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. कोलकाता येथील ऐतिहासिक ब्रिगेड परेड ग्राऊंडवर झालेल्या एका भव्य सोहळ्यात राज्यपाल आर. एन. रवि यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. या ऐतिहासिक सोहळ्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह देशातील दिग्गज नेते उपस्थित होते.



या विधानसभा निवडणुकीत भाजपने २९३ पैकी २०७ जागांवर प्रचंड विजय मिळवून पूर्ण बहुमत प्राप्त केले आहे. तर १५ वर्षे सत्तेत असलेल्या ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसला केवळ ८० जागांवर समाधान मानावे लागले. स्वतः शुभेंदू अधिकारी यांनी भवानीपूर मतदारसंघातून ममता बॅनर्जी यांचा पराभव करत 'जायंट किलर' ठरले होते.

शपथविधी सोहळ्यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी, शुभेंदू अधिकारी आणि प्रदेशाध्यक्ष समिक भट्टाचार्य एका विशेष रथावरून व्यासपीठाकडे रवाना झाले. यावेळी मोदींनी श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या सहकाऱ्यांचे आशीर्वाद घेतले, तसेच अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांचीही भेट घेतली.

या सोहळ्याला गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, नितीन नवीन, योगी आदित्यनाथ यांच्यासह महाराष्ट्रातून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह अनेक दिग्गज नेते उपस्थित होते. सुमारे २० राज्यांचे मुख्यमंत्री या सोहळ्याचे साक्षीदार बनले.



# पेट्रोल पंपावर स्कॅनर्सच्या माध्यमातून फसवणूक करणारी टोळी सायबर पोलिसांच्या जाळ्यात; साडेनऊ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)**– पेट्रोल पंपवर स्कॅनरच्या माध्यमातून अनेकांची फसवणूक करणाऱ्या टोळीला नांदेड येथील सायबर पोलीस स्टेशनच्या पथकाने अटक केली. अटक केलेल्यांमध्ये दोन तेलंगणा राज्यातील आणि एक पुणे येथील असल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यांच्याकडून साडेनऊ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

स्कॅनरवर फ्रॉड रक्कम टाकून रोख रक्कम स्विकारून फसवणूक करणाऱ्या टोळीचा जिल्ह्यात शिरकाव झाल्याची माहिती पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांना समजली. यावरून त्यांनी अशा घटनांवर आळा घालण्यासाठी सायबर पोलीस ठाण्याचे निरीक्षक वसंत सप्रे यांना सुचना दिल्या.



पोलीस ठाणे देगलूर येथे दि. २१ एप्रिल २०२६ रोजी तक्रारदार शेख मसूद शेख अब्दुल रशीद (वय ४५ वर्ष व्यवसाय व्यापार रा. गडीगल्ली देगलूर ता. देगलूर) यांनी तक्रार दिली की, दिनांक २० एप्रिल रोजी व त्यापूर्वी त्यांचे ठ अफसरा या नावाचे पेट्रोलपंप, जयश्री प्रभाकर पेट्रोलियम नरसी ता. नायगाव, अक्षय पेट्रोलियम बिजुर ता. बिलोली, सिध्देश्वर पेट्रोलपंप वझरगा ता. देगलूर, शिवांक हायवे पेट्रोलपंप अटकळी ता. बिलोली, व्यंकटेश्वरा पेट्रोल पंप देगलूर या पेट्रोल पंपाचे क्यूआरवर काही जणांनी पैसे पाठवून नगदी ६ लाख २४ हजार ८०८ रुपये घेऊन फसवणूक केली आहे. यावरून गुन्हा नोंद करण्यात आला.

त्यावरून सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान पेट्रोल पंपधारकांना विश्वासात घेऊन तसेच गुप्त खबरे नेमून अशा टोळीवर नजर ठेवण्यात येत होती. दरम्यान अशा टोळी देगलूर पो. स्टे हद्दीत आल्याची माहिती मिळताच सायबर पोलीस व पोस्टे देगलूर पोलीस स्टेशनच्या मदतीने सापळा रचून त्या टोळीतील एकाला जेरबंद केले होते. पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सायबर पोलीस ठाणे यांनी करून त्या टोळीतील एका आरोपीस निजामाबाद, तेलंगणा येथून तर मुख्य सुत्रधारास पुणे येथून अटक केली आहे. अटक केलेल्यां आरोपीमध्ये अल्ताफ सरवर सत्तार (वय २३, चालक रा. घुळा (मोठा) तालुका जुक्कल जि. कामारेड्डी तेलंगणा), योगेश उत्तम पांचाळ (वय २६, रा. घुळा (मोठा) तेलंगणा) आणि तौफिक आश्रफ शेख (वय २३, रा. मूळ जालना, ह.मु. पॅराडाईज ८०२ पांडवनगर चतु: श्रृंगी, पुणे) यांचा समावेश आहे. आरोपींकडून एक चारचाकी वाहन व रोख रक्कम असा नऊ लाख ३१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

सदर कामगिरी करणारे अधिकारी व अमंलदार यांचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी कौतुक केले आहे. तसेच नांदेड जिल्ह्यातील सर्व पेट्रोलपंप चालक यांनी पेट्रोलपंपावर ऑनलाईन पैसे स्वीकारून ते पैसे रोखीने कोणालाही देवू नये तसेच आपल्या सोबत सायबर क्राईम घडल्यास तात्काळ १९३० किंवा cybercrime.gov.in या साईटवर जावून तक्रारी किंवा जवळचे पोलीस स्टेशन किंवा सायबर पोलीसांनी कळवावे असे आवाहन करण्यात आले.

## एन. रंगस्वामी १३ मे रोजी पाचव्यांदा पुदुचेरीच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार

**पुदुचेरी (प्रतिनिधी)**– केंद्रशासित प्रदेश पुदुचेरीमध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडीला (राजग) बहुमत मिळाल्यानंतर एन. रंगास्वामी १३ मे रोजी पाचव्यांदा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार आहेत. राजभवनात आयोजित करण्यात येणाऱ्या या शपथविधी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर राजकीय आणि प्रशासकीय स्तरावर तयारीला वेग आला आहे. यापूर्वी राजग आमदार दलाच्या बैठकीत शुक्रवारी एन. रंगास्वामी यांची सर्वसंमतीने आमदार दलाचे नेते म्हणून निवड करण्यात आली. त्यानंतर त्यांनी उशिरा रात्री उपराज्यपाल कैलाशनाथन यांची भेट घेऊन सरकार स्थापनेचा दावा सादर केला. यावेळी त्यांनी १८ समर्थक आमदारांची समर्थनपत्रेही सुपूर्द केली.नवीन सरकार स्थापनेच्या प्रक्रियेसोबतच मंत्रिमंडळाचे स्वरूप आणि खात्यांच्या वाटपाबाबतही चर्चांना वेग आला आहे.

# बाजिंदा जणू

वऱ्हाडी कथा

पोटात एक त व्हठात एक. अशी मानसं बाया आपल्या चवभवताल आपल्याले दिसून येतीनं. काही काही त इतके बारीक असतात की, मी नाही त्यातला अन् कोंडा लावा आतला असे असतात. काही लोकं त पाप करूनं बसतात अन्...पयले खाल्ले हाडकुळ अन् आता बसला देवापुळं अशी असतात. काही लोकं त निऱ्हा पाताळातल्या लायकीची असतात. तेयचा निचपना अनगीनत असतो. थ्याले मोजताच येत नाही. काही लोकं त गोळ बोलूनं काटा काहाळतात. तोंडावर गोळ गोळ बोलतीनं अन् आपल्या मांग दू तोंडी सापासारखं ईख ऊगवतीनं. ह्या लोकायले कोल्हा, साप, पाल ह्या जनावरायचं बिरूदं लावनंही थ्या जनावरायचा अपमान केल्या सारखा हाय. अशी ही बदमास बाजिंदी लोकं जिवनात आल्यावर मेंदूच पानी अन् आंगाचा पापळ करतात...

जामगाव एक लहानस खेळं. ह्या गावात जग्गू नावाचा महाकुचीन असा मानूस राह्ये. बरं कोनाचं सुद चाल्ल असन त बोट घालूनं ऊलट करन थ्याले चांगलच मालूम. बर कोनी बेमार असन, कोनी मेल असन, कोनाची सोयरीक टुटली असन, कोनाच घर पावसायात गयत असन, डुकरानं पेरलेलं धान ऊकरून खाल्ल असन त थ्याले लय हरिक होत असे असा महाबदमास मानूस जग्गू ह्या जामगावात राह्ये.

एका रोजी जामगावात पिंटीले पाव्हणे पाहाले आले. नास्टा झाला पाहणी झाली. पोरगी पसंत पळ्ळी. देनघेनं ठरलं. साखरपुळ्याची तारीक ठरली. पाव्हन्यानं बंडी काहाळली. बंडी धुळ्ळा ऊळवत पयत होती. पाव्हणे बाता करत होते. सारे पाव्हणे खुस होते. पोरीच्या ईषयी गोठी चाल्ल्या होत्या. जग्गू वावराच्या धुऱ्यावर रसत्यावर ऊभा होता. धुरकऱ्याले हात दाखवत थ्यान बंडी रोखली. अन् बाता हानाले लागला.

काय पाव्हने बुवा कुठूनं आले.

जग्गू बोल्ला.

जामगावात गेल्लूतो ब्वा.

पोराचा चुलता बोलला.

काहाले गेल्ते.

माणिकराव धनगराची पोरगी पिंटीले पाहाले.

हेच गाव सापळलं काय तुम्हाले पोरगी पाहाले. बाकी गावात काय पोरीचा दुकाय पळ्ळा.

जग्गूच्या बोलन्यानं पोराच्या मामाचे कान टवकारत माथ्यावर आठ्या आनल्या अन् जग्गूले म्हतलं...

तुमच नाव काय भाऊ.

मी जगन्नाथ काळे.

गाव कोन्च तुमचं.

हेच जामगाव...अखिन कोन्च त. ह्या गावचा खळानखळा मले मालूम हाय.

जग्गूच्या बोलन्यानं बंडीतले सारेच पाव्हने दनानले...पोराच्या बापाले वाटलं...'सायाचं कुठतरी पानी मुरते. ह्या मानसाले सारं खोदूनं ईचाराव.

माणिकरावची पोरगी कशी काय हाय ब्वा.

मी कोनत्या तोंडान सांगाव ब्वा. तुम्ही बादमंदी माह्य नाव घेवूनं माह्यचं नाव बदलाम करूनं मले काय गावाच्या लोकायचे जोळे खा ले लावता काय ब्वा.



फकस्त ईबलिस हासासाठी गदगदत होते. पोराकळचे पाव्हने ईचारात पळ्ळे सायाचं काय कराव. कस ईचाराव..मानूस बोलाले पाह्यत नाही. पोराच्या मामानं जग्गूले लालूच दाखवत बोल्ला...

हे पा जगन्नाथ पाव्हने ब्वा. तुम्हाले शंभरी देतो. खर खर सांगा ब्वा पिंटी बद्दल.

कोन्च्या तोंडानं सांगू ब्वा तुम्हाले तुम्ही माह्यच नाव घेवूनं सोयरीक तोळसानं अन् माह्यी गावात बदलामी करसानं... गाव करे थे राव करू शकते काय ब्वा.

आम्ही तुम्च नाव नाही घेत ना ब्वा. आता तरी झालं. नाही नाही! मी कसा काय ईस्वास ठेवू नवाळ्या मानसायवर. तोळाचं कारन भेटल त, माह्यावालचं नाव घेसानं अन गावाचे काय जोळे खावू काय. जग्गू भाऊ शंभरी सोळा दोनशे रूपये देतो तुम्हाले अन् तुमचं नावही कोनाच्याही तोंडातून निंगनार नाही आम्ही आमच्या लेकराबाकरायची शप्पथ खातो.

पोराचा बाप कायजीत पळ्ळा. 'सायाचं पोरी ईषयी ना कोनाले ईचारपूस केली ना काह्यी. साखरपुळ्याची तित ही धरली.'

ओ जगन्नाथ भाऊ खर खर सांगा ब्वा कशी काय हाय पोरगी. नाहीत फुकटच फसूनं जावू आमी.

पोराचा बाप थरथरल्यागत व्हठानं बोल्ला.

काय सांगाव ब्वा! आपलेच व्हठ अन् आपलेच दात. गावाचा मामला...हाय. मलेच करसान तुम्ही बदलाम. आमचेच व्हठ अन् आमचेच दात.

पोराकळचे सारेच पाव्हने जग्गूच आयकून हपचक झाले पन थो खर काय थे सांगत नोता. थ्याची दातकई

पोराचा बाप बोल्ला...आता दोनशे म्हतल्यावर जग्गूच्या तोंडाले लाय सुटली... पा ब्वा सांगतो त खरी पन नाव नका घेवू माह्यावालं नाही त गावात मान खाली घालूनं फिरा लागनं. नाही सांगत जग्गूभाऊ कोनालेच ईस्वास ठेवा.

बर सांगतो...थ्या पिंटीचा हायना गावातल्याच धन्या सोबत जांगळगुत्ता सुरू हाय. जांगळगुत्ता म्हनजे काय हो! पोराच्या मामानं सवाल केला.

अहो जांगळगुत्ता म्हनजे लफळ, झटांग, गुटरूंग गू, धटिंग, परकरन...अस्स अस्स...गेल्या चार साल पासूनं तेयचं लफळ सुरू हाय...काय दोघ पळीतायनं, पांदीतन फिरतात. लाजशरम सोळ्ळी सायाच्यायनं. कोनी त तेयले लैला-मजनू, हिर- रांजा, सोनी-महिवाल, रेखा- अबिताब... असे नाव ठुयले हाय तेयचे...जग्गूचं बोलनं आयकून लागलीच बंडी फिरोली गेली...

अरे ओ भाऊ गोठ सांगाचे दोनशे रूपये...

पांड्या इतवारी देतो हं. बंडी जामगा- वात आली. सोयरीक तोळन्यात आली... पोरीच्या बापाले मानिकरावले कयलच नाही सोयरीक कामून तोळ्ळी त...घरंदाज पोरगी पिंटी, कष्टाळू पिंटी, कोनाकळे तिरप्या नजरेनही न पायनारी पिंटी...पन बदमास जग्गू न तीले बदलाम केलं. असा होता बाजिंदा जग्गू...

**-सु. पुं. अढाऊकर**
अकोला
मो. ९७६९२०२५९७

# आईविना जग नाही; वडिलांविना आधार नाही!



प्रेम व निस्वार्थ मायेचा वटवृक्ष म्हणजेच माय! आईचा मानसन्मान व्हावा या उद्देशाने जगात दरवर्षी मे महिन्याच्या दुसऱ्या रविवारला मातृदिन (मदर्स डे) साजरा केला जातो.त्या अनुषंगाने यावर्षी मातृदिन १० मे २०२६ रविवारला येत आहे. त्यामुळे पितृत्व आणि मातृत्व या परीभाषांशी किती जवळच आणि रक्ताच नात असते हे आपल्याला आई-वडील या शब्दावरूनच सहज समजून येते.या जगात माय-बापा शिवाय कोणीही मोठा नाही. आई-वडील,माय- बाप या शब्दाला सुध्दा कुठेही तोड नाही. कारण आई-वडील हा शब्द फक्त मानवजाती पुरताच सीमित नसून संपूर्ण जीवसृष्टी, पशुपक्षी व जीवजंतू या शब्द- ाशी निगडित आहे. तेव्हाच आपल्याला उत्पत्ती, संस्कार,संस्कृती, जडणघडण, रहनसहण, खा- नपान सर्वत्र दिसून येते. ज्याप्रमाणे आई - वडील मुलांची जोपासना करते. त्याचप्रमाणे पशुपक्षी व संपूर्ण जीवसृष्टी आपल्या पिल्लांची(मुलांची)जोपासना करून लहाण्याचे मोठे करतात.ही ईश्वरी देणच आहे. त्यामुळे या जगात आई-वडिलांपेक्षा कोणीही मोठा नाही हेही तितकेच सत्य आहे. कारण वडिलांवर आपल्या मुलांचीच नाही तर संपूर्ण कुटुंबाची मोठी जबाबदारी असते. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या व इतर बाबतीत सुरक्षेची ढाल बनून वडील आपले कार्य तत्परतेने करीत असतो.

आई-वडिलांची भूमिका समान असते. आई नेहमी मायेचं पांघरूण घालत असते तर वडील पहाडासारखा संपूर्ण कुटुंबाची रक्षा करून सुरक्षा कवचची भूमिका निभवत असतो. सर्वांनीच आई- वडिलांची सेवा व सन्मान करायला हवा. आईचा मानसन्मान करून पितृ दिवस हा तर दररोज साजरा करायला पाहिजे. परंतु जगाला जाण रहावी म्हणून ठराविक दिवशी मातृदिनला महत्व आहे. पितृ दिन असो किंवा मातृ दिन दोन्ही दिवस एकसमानच असतात यात यत्किंचितही फरक नाही. फक्त जबाबदाऱ्या वेगवेगळ्या असतात. त्यामुळे मुल-मुली यांच्या केसालाही धक्का लागणार नाही याची काळजी नेहमी घेऊन तत्परता दाखवित असतात. कारण मातृदिनाचा इतिहास १८६० या दशकाशी संबंधित आहे. त्यामुळे सर्वप्रथम मातृदिनाची सुरूवात १९०८ साली अमेरिकेतून झाली. यानंतर पितृदिनाची मागणी व्हायला लागली व अधिकृतपणे १९१० ला पितृदिनाला सुरूवात झाली. मात्र पितृदिन साजरा करण्याच्या तारखां- मध्ये मतभेद आहेत. मातृत्व दिन (मदर डे) प्रमाणेच वडिलांचा आदर सन्मान व्हावा व कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पितृदिन (फादर डे) साजरा केला जातो. जगात आई-वडील या शब्दाला सुध्दा तोड नाही. कारण जगातील कोणतीही भाषा असो, मामा-मामी, काका-काकू, माऊशी, आत्या इत्यादी अनेक नाते आहेत व यासाठी वेळोवेळी शब्दप्रयोग सुध्दा आ- हेत. परंतु जगातील कोणत्याही कानाकोपऱ्यात जा तुम्हाला आई-वडील यांच्यासाठी एकच शब्द दिसेल. उदाहरण द्यायचे झाले तर आई-बाबा, मम्मी-पप्पा अशाप्रकारे जगात एकच शब्द आपल्याला आई- वडिलांसाठी दिसून येईल ही एक सृष्टीची लिलाच म्हणावी लागेल.

मानवी नातेसंबंध आणि जगातील वेगवेगळ्या नात्यातील एक नातं म्हणजे आई-वडिलांचं नातं. वडिलांचे आणि मुलांचे नाते म्हणजे समुद्रा- तील पाण्यासारखे अफाट असते. कारण प्रत्येक आई मुलांना घडवीते, सुसंस्कृत करते. पदोपदी मुलांची काळजी घेऊन जोपासना करते, यातच मातृत्व दडलेले दिसून येते. कारण आई मुलांच्या सानिध्यात चोवीस तास असते. त्यामुळे आपले मूल काय करीत आहे आणि आपण त्यांच्यासाठी काय केले पाहिजे याची चाहूल आईला कळत-नकळत कळते व त्यापद्धतीने मुलांचे संगोपन करीत असते.

आई अशी दैवी शक्ती आहे की, आकाश पा- ताळ एक करते. परंतु मुलाला कधीच उपाशी ठेवत नाही. आई घरातील सर्वांचे जेवण झाल्यानंतरच जेवण करीत असते. आई-वडिलांचं नातं या भूतलावर अफाट असून न-भूतो- न- भविष्यती अशाप्रकारचे हे नाते आहे. कारण वडील भूक-तहान विसरून आपल्या कुटुंबाकरिता राबत असतो व घरग्रहस्ती चालवितो. म्हणजेच घराला आर्थिक बळ देण्याचे काम वडील करीत असतात तर वडिलांनी केलेल्या कमाईच्या आधारे घर चालवण्याची मोठी जबाबदारी आईची असते.कारण मोजक्या पैशात आईला घर चालवायचे असते. म्हणजे घरात काय कमी जास्त आहे हे सर्व आईलाच पहावे लागते व ही तीची मोठी कसोटीची परीक्षा असते. समाजात आईच्या कार्याला तोड नाही व वडिलांच्या कर्तृत्वाला कोणीही मात करू शकत नाही. म्हणून सर्वांनीच लक्षात ठेवले पाहिजे की, आपले खरे गुरु व दैवत आई-वडीलच आहेत. त्यामुळे आजच्या तरुण पिढीने आई-वडिलांना प्रथम स्थानावर ठेवले पाहिजे. आई या शब्दाला किती म हत्त्व आहे हे आपण या ओवीवरून समजू शकतो.

आई माझा गुरु, आई कल्पतरू सुखाचा सागर आई माझी, प्रीतीचे माहेर, शांतीचे आगर मांगल्याचे सारं आई माझी. म्हणजे आईविना जग नाही आणि वडिलांविना आधार नाही. आपल्याला थोडीशी जरी इजा किंवा दुर्घटना झाली तर मुलं आईगं म्हणून किंचाळतो तेव्हा आईच्या रूपात कोणी-ना-कोणी अवश्य धावून येतोच ही दैवी शक्ती आई या शब्दात आपल्याला दिसून येते. या उलट वडिलांचे आहे. एखादी मोठी दुर्घटना घडली तर प्रत्येक व्यक्ती बापरे म्हणून जोरांनी ओरडतो अशा वेळी ताबडतोब आजूबाजूला असलेले ना- गरीक वडिलांची भूमिका बजावतात. म्हणजेच वडील तिथे नसतानासुध्दा तेथील संपूर्ण नागरिक वडिलांची भूमिका बजावतात. अशा वेळी आपणही म्हणतो की, लोक देवासारखे धावून आले. म्हणजे आईग आणि बापरे या कठीण शब्दांसामोर सर्वसामान्य म ाणूस आपल्या आई-वडिलांची भूमिका बजावतात व दैवी रूपाने मदतीला धावून येतात. मानवजातीम ध्येच ज्याप्रमाणे आईची भूमिका असते त्याचप्रमाणे संपूर्ण पशुपक्षी व जीवसृष्टीमध्ये आईची भूमिका अग्रगण्य असल्याचे आपल्याला दिसून येते.कारण मुलांच्या आयुष्यात नेहमीच ती सूर्याच्या प्रकाशा- प्रमाणे वावरत असते जेणेकरून मुलांच्या आयुष्यात कुठेही अंधक्कार पडणार नाही याची काळजी घेत असते. कारण आई आपल्या मुलांसाठी आपल्या जीवाचा आटापिटा करून मुलाला लहाणाचा मोठा करते. त्यामुळे आज सर्वांचीच प्रथम जबाबदारी आहे की, आपल्या आई-वडिलांची सेवा करणे, पा- लणपोषण करणे, त्यांच्या प्रकृतीची काळजी घेणे व त्यांच्या वेदना जाणून घेऊन त्यांवर उपाययोजना करणे आणि आई-वडिलांना सुखी व समाधानी ठेवणे यातच आपल्याला खरा जागतिक मातृदिन दिसून येईल.

माझ्यामते मातृदिन ठराविक दिवशीच का साजरा करावा? दररोज साजरा का करू नये? मी तर म्हणेन की मातृत्व-पितृत्व दिवस हा दररोज आई-वडिलांची सेवा करून साजरा केला पाहिजे व आपण ते दिवस आठवायला पाहिजे की, आपल्याला लहाण्याचे मोठे करण्यासाठी आईने किती यातना व दुःख सहन केले असा- वे, याची जाणीव आज मुलांनी ठेवण्याची गरज आहे. कारण आईने आपल्याला वटवृक्षाच्या छायेत लहाण्याचे मोठे केले व याच वटवृक्षाचा पहारेकरी म्हणून वडिलांनी आपली चोख भूमिका बजावली. आई-वडिलांच्या तत्परतेमुळेच मुलांच्या केसालाही धक्का लागत नाही ही दैवी शक्तीच म्हणावी **लागेल**.

मातृदिनाच्या निमित्ताने मी सर्वांना हेच सांगु इच्छितो की आपण सर्वांनी भारतीय संस्कृतीच जपायला हवी यातुनच आपल्याला खऱ्या अर्थाने आई-वडीलांची सेवा करता येईल. पाश्चिमात्य देशात आई-वडील सोडून इतर नातेसंबंध अंकल व टी या दोन शब्दात संपुष्टात आली आहे. परंतु भारतीय संस्कृतीत आजी, आजोबा,काका, काकु,मामा,मामी, मावशी,आत्या इत्यादी अनेक वेग- वेगळे शब्द आपल्याला वेगवेगळ्या नात्यांप्रमाणे दिसून येतात त्यांचा सन्म ान व्हायलाच पाहिजे.त्यामुळे अंकल- न्टी हे पाश्चिमात्य शब्द विसरायला हवे. त्याचबरोबल मम्मी-पप्पा या शब्दांना पुर्णविराम देऊन आई-बाबा असे शब्द ऐकू आले तर भारतीय संस्कृतीचा सन्मानच अवश्य होईल असे मला वाटते.सध्याच्या काळात काही मुल-म ुली आई-वडिलांची सेवा करण्यास असमर्थ दिसून येतात अशा परिस्थितीत आई-वडिलांना वृध्दाश्रमाच्या खाईत लोटतात हेही आई-वडिलांच्या प्रती दुर्भाग्यच म्हणावे लागेल.परंतु असे व्हायला नको असे मला वाटते. आई या शब्दाला इतके महत्त्व आहे की, स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारीयावरून आपण समजू शकतो की आई या शब्दात किती मोठी अफाट माया व शक्ती आहे. आपण १० मे ला मातृदिन (मदर्स डे) साजरा करीत असतांना पृथ्वी मातेचाही थोडासा विचार करायला हवा.कारण आज पृथ्वीची जोपासना होत नसल्याने दिवसेंदिवस हवामानात बदल होत आहे.याकरीता जागतिक मातृदिनाचे औचित्य साधून प्रत्येक म ुलांनी आई-वडीलांच्या आठवणीत रहावे यासाठी आजच्या दिवशी एकतरी वृक्ष लावले पाहिजे.यामुळे एकाच दिवशी देशासह संपूर्ण जगात लाखोंच्या संख्येने वृक्ष लागवड झाल्याचे आपल्याला दिसून येईल.यामुळे पृथ्वीचे संतुलन स्थिर रहाण्यास मोठी मदत होईल व आई-वडीलांना निसर्गाचा आनंद घेता येईल.जय हिंद.

**-रमेश कृष्णराव लांजेवार**
नागपूर
मो. ९९२१६९०७७९,

## जाब

नराधमे हिंस्त्रक झाले
कां? टाकती खुडून कळ्या!
जाब तयांना कोण पुसे ह?
भ्रष्टतेच्या वाटा सगळ्या.
निस्तब्धतेच्या दाहीदिशा
निरवतेची काजळमाया
प्रश्नांकित उत्तरांची सभा
श्रद्धांजलीची पोकळ माया
आज उसासा उद्या दिलासा
माध्यमांची चाले चळवळ
थकली सारी बा नाती गोती
दुःखाची नुसती हळहळ
उजाड झाले माय बाप ते
कसे जगावे विरले जिणे
दिसे निरंतर लेक मनी
असह्य विरहाचे रडणे
पाशवी विकृती असतील
इथे तिथे अवती भवती
नष्ट करू या दुष्ट शक्तींना
अश्या शक्ती नको जगती
संकल्प करू सार्थ मनाने
सात्विकतेची धरू या कास
नीतिमत्ता आणि चारित्र्याची
सदैव असो मनात ध्यास

**-ललिता शिंदे (बोकारे)**
सिडको मोंढा, नांदेड
मो. ९८६०४६३३५२

# झाडे लावा आणि सुंदर जगा

माणसाला माणसाचं अस्तित्व या पृथ्वीवर टिकवून ठेवायचं असेल तर काही बाबींचं नियोजन करावंच लागेल जसे की सुंदर व सुदृढ जगण्यासाठी गरज असते ती चांगल्या व्यायामाची, अंग मेहनतीची, वर्तणुकीची, प्रेमळ भावनेची, निस्वार्थपणाची, नाते जपण्याची, एकमेकांतल्या उत्तम संवादाची, काही देणे लागते या उदात्त भावनेची. अन् चांगल्या प्रकारे जगण्यासाठी गरज असते ती म्हणजे शुद्ध हवेची.

पृथ्वीतलावरचा एकमेव हुशार असलेला प्राणी म्हणजे मानव आहे. पण मानवाच्याच हातून बरेचसे नुकसान होताना दिसत आहे. त्यातलेच एक म्हणजे कमी होत असलेले झाडांचे प्रमाण आहे.

खरंतर दिवसेंदिवस जिकडे तिकडे झाडेच झाडे दिसायला पाहिजे होते पण तसं दिसत नाही. उलट झाडांचे प्रमाण वाढण्यापेक्षा कमी होताना दिसत आहे. आणि यातूनच सध्या मानव आपलं कर्तव्य विसरून जात असल्याची भीती निर्माण होत आहे. म्हणून या हुशार माणसाने निसर्गाशी तितक्याच हुशारिणे माणस- ासारखं वागलं पाहिजे तर आणि तरच निरोगी व सुंदर जीवन जगता येईल.

जन्माला येणाऱ्या प्रत्येक माणसाने आपापल्या परीने चांगले कर्म करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यातूनच काहीतरी देणे लागते या उद्देशाने काही न काही समाज हिताचे कामे केली पाहिजे. तसं तर मानवा सोबत निसर्गाची सेवा करायची असल्यास अनेक सेवा देण्याचे



कार्य आहेत. कोणतेही एक चांगले काम हाती घेऊन पुढे जात राहिलं पाहिजे.

मानवाला धरतीवरती सुखाने जगायचं असल्यास काही गोष्टींचं नियोजन केलंच पाहिजे. त्यात सर्वप्रथम झाडे लावली पाहिजे. नीट संगोपन करुन त्याला जगवले पाहिजे. कारण बऱ्याचदा असं होतं की, नुसते नावालाच झाडे लावले जातात, वास्तव वेगळेच असते. म्हणून थोडी जरा अधिकची काळजी घेतली तर या सिमेंटच्या जंगलामध्ये थोडी थोडी झाडांची सावली वाढली की माणसांच्या जीवासोबत अनेक जीवजंतू पशु-पक्षी वन्यप्राण्यांचे ही जीवन भरपूर सुंदर होते याची प्रचिती मिळते. मानवाला हवेची जितकी गरज आहे? त्याच्या कितीतरी पटीने गरज आहे ती म्हणजे झाडांची. कारण एक झाड अनेक गुणांनी समृद्ध असते. सर्वांच्या आरोग्यासाठी प्राणवायू देणारे व जीवन सुदृढ ठेवण्यासाठी वनस्पतींचा खजाना घेऊन उभे टाकलेले असते. त्यासोबतच झाडांच्या सावलीने जमिनीला थंडावा मिळतो. फळे मिळतात...

धरती आणि निसर्गाचं कालचक्र अबाधित ठेवण्यासाठी झाडं सतत प्रयत्नशील असतात. एक वेळ माणूस बदलेल पण झाड बदलत नाही. तसेच झाडांच्या निमित्ताने पाण्याची पातळी ही टिकून राहण्यास मदत होते असे म्हणतात.

लिहिण्याचे कारण असं की, उन्हाळा चालू आहे. उन्हाचा कडाका खूप वाढलाय. तापमान वाढीचे काम अधिक तीव्र होत आहे. उन्हाळ्यात पाण्याची बचत करण्यासाठी बऱ्याच जणांकडून प्रयत्न होत नाहीत. बऱ्याच ठिकाणी पाण्याची टंचाई दिसायला लागली. टंचाईग्रस्त भागात ज्यांना पाणी नाही असे लोक डोक्यावर घागरी घेऊन पायपीट करतात आणि ज्यांना ज्यांना मुबलक पाणी आहे असे लोक विनाकारण पाणी वाया घालतात. म्हणून या ठिकाणी लिहिण्याचा छोटासा प्रयत्न केला आहे.

खरं तर मी तज्ञ नाही. मला अधिकची जाणीव नाही. तरीही थोडक्यात मनाला जे वाटते ते लिहिण्याचा प्रयत्न करावा वाटते. किमान प्रतिवर्षी प्रत्येकाने एक तरी झाड लावून त्याला वाढवले पाहिजे. मग तुम्ही कोणतेही औचित्य साधा, पण झाडे लावा. तुमचे एक झाड सर्वांचे रक्षण करण्यासाठी तत्परतेने आणि खंबीरतेने दंड थोपटून उभा असेल... तुमचं सुदृढ जीवन अबाधित ठेवण्यासाठी झाडांकडून खात्री नक्कीच पटेल. मग काय, कसला विचार करता? झाडे लावून सुंदर जगा. कारण या धरतीचे रखवाले तुम्हीच आहात.

**- गोविंद कवळे**
इळेगाव, ता. उमरी, जि. नांदेड
मो. ७३८७२६७२१९

## हसा आणि हसवत राहा...

धकाधकीच्या आयुष्यात
निवांतपणा हरवलाय
ताणतणाव आणि दगदग
जगण्याचा हिस्सा झालाय
हसल्यामुळे शरीरात येतो
एंडोर्फिस हा फील गुड
वेदना सा-या क्षमतात
अन...चांगला होतो मूड
आता हसण्याचा सर्वांना
विसर पडू लागतोय
दैनंदिन आयुष्यात व्यक्ती
दुःख घेऊनच जगतोय?
हसा आणि हसवत राहा
ठेवून स्वच्छ भावना
हसण्याचे अनेक फायदे
ागवा ही मनात संवेदना
हसणे हा आहे मित्रांनो
रोंगा वरील उपाय रामबाण
खळखळून हसण्यासाठी
कशाला हवाय मानपान?

**-रुपाली वागरे/वैद्य**
नांदेड
९८६०२७६२४१

# महापालिका आयुक्त डॉ. डोईफोडे यांनी केली मान्सूनपूर्व नालेसफाईची प्रत्यक्ष पाहणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** मान्सूनपूर्व नालेसफाईची मोहीम सध्या प्रगतीपथावर असून महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी शनिवार, दिनांक ९ मे रोजी शहरातील विविध भागांतील मान्सूनपूर्व नालेसफाई कामांची प्रत्यक्ष पाहणी केली आहे. पावसाळ्यात शहरात पाणी साचू नये आणि नैसर्गिक नाल्यातील पाण्याचा निचरा सुरळीत व्हावा, यासाठी प्रशासनाकडून युद्धपातळीवर स्वच्छता मोहीम राबवली जात आहे.



या पाहणी दौऱ्यात आयुक्तांनी शहरातील मुख्य नाले, तसेच सखल भागातील सांडपाणी वाहिन्यांच्या सफाई कामांची पाहणी केली. यामध्ये प्रामुख्याने शहरातील श्रावस्तीनगर, दुलेशहा रहेमाननगर, खडकपुरा, सोमेश कॉलनी येथील भाजी मंडई, अण्णाभाऊ साठे पुतळा ते वसंतराव नाईक चौक नाला, मालटेकडी ब्रिज, बायपास सना इंटरनॅशनल स्कूल व मोहम्मद कॉलनी नाला येथील कामाचा समावेश होता. नालेसफाईचे काम केवळ वरवर न करता नाल्यांमधील संपूर्ण गाळ, कचरा आणि राडारोडा काढून नाले पूर्णपणे मोकळे करण्याचे कडक आदेश त्यांनी संबंधित विभागाला दिले आहेत. पावसाळा सुरू होण्यापूर्वी साधारणपणे ३१ मेपर्यंत शहरातील सर्व मोठ्या आणि छोट्या नाल्यांची स्वच्छता पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे खाजगी जागा मालकांनी आपल्या क्षेत्रात रेखांकने विकसित करताना नैसर्गिक नाल्यांचा प्रवाह बदलला असल्यास अथवा अरुंद केला असल्यास त्याबाबत नगररचना विभाग व संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांनी तपासणी करून पावसाच्या पाण्याचा योग्यरीतीने निचरा होण्याच्या दृष्टीने नियमोचित कारवाई करण्याचे निर्देश यावेळी पालिका आयुक्तांनी दिले. तसेच ज्या ठिकाणी दरवर्षी पाणी साचते, अशा 'ब्लॅक स्पॉट्स'वर विशेष लक्ष देऊन तिथे अतिरिक्त मनुष्यबळ आणि यंत्रणा तैनात करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पावसामुळे पसरणाऱ्या जलजन्य आजारांना प्रतिबंध करण्यासाठी आरोग्य विभागाने पाणी साचणाऱ्या ठिकाणी धूर फवारणी आणि क्लोरिनेशन करावे, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

या पाहणी दरम्यान महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, उपायुक्त नितीन गाढवे, स्वच्छता विभागाचे सहाय्यक आयुक्त मो. गुलाम सादिक, शहर अभियंता सुमंत पाटील, कार्यकारी अभियंता दिलीप टाकळीकर, क्षत्रिय अधिकारी फरहतुल्ला बेग, रावण सोनसळे, मुख्य स्वच्छता निरीक्षक वासिम तडवी आणि संबंधित प्रभागाचे स्वच्छता निरीक्षक उपस्थित होते.

# मनपा स्थायी समितीच्या बैठकीत ४१ कोटींच्या विकासकामांना मंजुरी

**नांदेड (प्रतिनिधी)–** महानगरपालिकेच्या स्थायी समितीची बैठक शुक्रवारी उशिरा पार पडली. या बैठकीत शहरातील विविध प्रलंबित आणि अत्यंत आवश्यक असणाऱ्या विकासकामांच्या निविदांना मंजुरी देण्यात आली आहे. शासनाकडून मिळालेला निधी आणि महानगरपालिकेचा स्वतःचा हिस्सा अशा एकूण ४१ कोटी रुपयांच्या विकासकामांच्या प्रस्तावांना यावेळी हिरवा कंदील दाखवण्यात आला. या निर्णयामुळे शहरातील पायाभूत सुविधांच्या विकासाला मोठी गती मिळणार आहे.



या मंजूर कामांमध्ये शहरातील पाणी निचरा आणि पूर नियंत्रणासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या कामांचा समावेश आहे. मूलभूत सुविधांतर्गत नगरोत्थान योजना, सुवर्ण जयंती योजना आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या माध्यमातून शहरातील नाल्यांच्या कामांसाठी १६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. पावसाळ्यात निर्माण होणारी पुराची समस्या आणि सांडपाण्याचा प्रश्न निकाली काढण्यासाठी हा निधी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

नाल्यांच्या कामांसोबतच शहरातील इतर मूलभूत सोयी–सुविधांच्या विकासासाठी एकूण २० कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी देण्यात आली आहे. यामध्ये शासनाच्या ३६ कोटी रुपयांच्या एकूण निधीसोबतच महानगरपालिकेने स्वतःच्या तिजोरीतून ५ कोटी रुपयांचा स्वनिधी उपलब्ध करून दिला आहे. मंजुरीची प्रक्रिया पूर्ण झाल्यामुळे आता प्रत्यक्ष कामांना प्रत्यक्ष जमिनीवर सुरुवात होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे, अशी माहिती स्थायी समितीचे सभापती वीरेंद्रसिंघ गाडीवाले यांनी बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना दिली.

या बैठकीत अभिषेक सौदे, तुळजाराम यादव, सविता बिरकले, सुनीता जोंधळे, कविता गड्डम, राहूल सोनसळे, आशिष नेरळकर, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, निलेश सुनकेवार, उपायुक्त अभिजीत वायकोस, वित्त व लेखाधिकारी पांडे यांच्यासह अन्य सदस्य व विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# अवैध गोवंश वाहतूक प्रकरणी बोलेरोसह ६ लाख ६४ हजारांचा मुद्देमाल जप्त

**नायगाव बाजार (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्ह्यात अवैध गोवंश वाहतुकी विरोधात सुरू असलेल्या 'ऑपरेशन क्रॅकडाउन' मोहिमेंतर्गत रामतीर्थ पोलिसांनी धडक कारवाई करत चार गोवंश जनावरे व एक बोलेरो पिकअप वाहन असा एकूण ६ लाख ६४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी एका आरोपीविरुद्ध प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम १९६० अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात झाला असल्याची माहिती रामतीर्थ पोलीस ठाण्याचे सपोनि विक्रम हराळे यांनी दिली आहे.



याबाबत सविस्तर माहिती अशी की, पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांनी जिल्ह्यात अवैध जनावरे वाहतूक करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले होते.

दिनांक ७ मे २०२६ रोजी रात्री ९:३० वाजताच्या सुमारास रामतीर्थ पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक विक्रम हराळे यांच्या नेतृत्वाखाली पोहेकॉ गणपत राठोड, सोनकांबळे, बेळीकर आदी पोलीस कर्मचारी हद्दीत गस्त घालत होते. यावेळी देगलूर रोडवरून एका वाहनातून अवैधरित्या गोवंश जनावरांची वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली.

माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून संबंधित बोलेरो पिकअप वाहन (एमएच–२६–८२२७) अडविले. तपासणी दरम्यान वाहनामध्ये चार गोवंश जातीची जनावरे अत्यंत क्रूरपणे, आखूड दोरीने बांधून अमानुष पद्धतीने वाहतूक केली जात असल्याचे आढळून आले.

# महात्मा बसवेश्वर पुतळ्याच्या सुशोभीकरणाचा ठराव झालेला असताना जाणिकपूर्वक राजकारण करू नये –नगराध्यक्ष शरद पवार

**लोहा (प्रतिनिधी) –**लोहा शहरात महात्मा बसवेश्वर यांचा पुतळा आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्वात बसविण्यात आला. आम्ही सतेत आलो की, दुसऱ्याच सर्वसाधारण बैठकीत पुतळा सुशोभीकरण ठराव घेण्यात आला आहे, असे नगराध्यक्ष शरद पवार यांनी यावेळी सांगितले.

पुढे पवार म्हणाले, प्रशासकीय पातळीवर पूर्ण प्रक्रिया करून पुतळा सुभोभीकरण करण्यात येणार आहे. परंतु केवळ राजकारणासाठी पुतळ्याची ढाल करून मोर्चा काढला आणि आ. चिखलीकर यांच्या विषयी टीका केली. शहरात पिढ्यान्पिढ्या गुण्यागोविंदाने नांदण्याची परंपरा आहे. त्यात जातीवादाचे विष कालवू नका, लोहा शहर शेवडी बाजार करण्याचा अजेंडा येथे चालणार नाही. आम्ही चिखलीकरांच्या नेतृत्वात पुतळा सुसोभीकरणाशी वचनबध्द आहोत.लोह्याचा सामाजिक एकोपा बिघडवू नका, असे आवाहनही नगराध्यय शरद पवार यांनी केले.



लोहा शहरात प्रा. मनोहर घोंडे यांच्या नेतृत्त्वात महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळा सुशोभीकरणासाठी नगरपालिकेवर मोर्चा काढण्यात आला. या मोर्चाला नगराध्यक्ष शरद पवार यांनी पत्रकार परिषदेत प्रत्युत्तर दिले. या पत्रकार परिषदेत सर्व नगरसेवक, पदाधिकारी उपस्थित होते

जगत्ज्योती महात्मा बसवेश्वर पुतळा सुशोभीकरणासाठी मोर्चा काढण्यात आला होता. त्या पार्श्वभूमीवर नगराध्यक्ष शरद पवार यांनी पत्रकार परिषद घेऊन प्रा. धोंडे यांच्यावर पलटवार करीत लोहा शहरातील अनेक वर्षानुवर्ष एकोपा, एकजूट एकात्मता याला 'जातीवादात बांधू नका, अस आवाहनही शरद पवार यांनी केले.

# आयजी पथकाची अहमदपूरमध्ये जुगार अड्ड्यावर कारवाई

## नऊ आरोपींविरुद्ध गुन्हा, तीन लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी) –**नांदेड परिक्षेत्रात अवैध व्यवसाय विरोधी मोहीम पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी सुरू केली. त्यांनी नेमलेल्या विशेष पथकाने लातूर जिल्ह्यातील अहमदपूर तालुक्यात एका जुगार अड्ड्यावर कारवाई करून नऊ जणांना ताब्यात घेतले.



शुक्रवार, दि. ८ मे २०२६ रोजी पथकाने अहमदपूर तालुक्यातील काजळ, हिप्परगा येथील विसावा बारच्या दुसऱ्या मजल्यावर छापा टाकला असता, सदर ठिकाणी तिर्रट नावाचा जुगार खेळताना ९ इसम मिळून आले. सदर जुगारी यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून ५८ हजार ५०० रुपयांची रोकड, ७७ हजार रुपयांचे ९ मोबाईल व २ लाख १० हजार रुपयांच्या ४ मोटारसायकली असा एकूण ३ लाख ४५ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, त्यांच्याविरुध्द अहमदपूर पोलीस ठाणे येथे गुरनं २८०/२०२६ कलम ४, ५ महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर प्रकरणाचा पुढील तपास अहमदपूर पोलीस ठाण्यातील सपोउपनि प्रकाश चिमनदरे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

सदर कारवाईत पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांच्यासह हवालदार प्रदीप खानसोळे, हवालदार संजीव जिंकलवाड, अंमलदार गणेश धुमाळ व कामाजी गवळी यांनी सहभाग घेतला. पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन करून त्यांना प्रोत्साहित केले आहे.

परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांना पायबंद घालण्यासाठी, पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाने 'खबर' नावाची हेल्पलाईन सुरू केली असून, नागरिकांनी आपल्या भागात चालणाऱ्या अवैध व्यवसायांची माहिती ९१ ५० १०० १०० हा मोबाईल क्रमांक असलेल्या 'खबर' या हेल्पलाईनवर फोन करून अथवा व्हाट्सअप मेसेजद्वारे द्यावी, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले आहे.


### नांदा सौख्यभरे

**उमाप–पावडे**

सौ. शैलजा मच्छिंद्रनाथ हरिभाऊ पावडे रा. बाभुळवाडी ता. पारनेर, जि. अहिल्यानगर यांची सुकन्या चि.सौ.कां. प्रियंका हिचा शुभविवाह सौ. सुनंदा सुभाष बाबुराव उमाप रा. जातेगाव बु., ता. शिरूर, जि. पुणे यांचे चिरंजीव अजिंक्य यांचे समवेत आज रविवार, दि. १० मे २०२६ रोजी सायं. ६.५२ वाजता भव्य साम्राज्य बँक्वेट हॉल, कासारी फाटा–तळेगाव ढमढेरे रोड, ता. शिरूर, जि. पुणे येथे सानंद संपन्न होत आहे.
वधू–वरांस हार्दिक शुभेच्छा.

**–मुख्यसंपादक**

### नांदा सौख्यभरे

**देशमुख–इंगळे**

सौ. सुरेखा बबनराव इंगळे रा. परोटी ता. किनवट, जि. नांदेड ह.मु. हिंगोली गेट, नांदेड यांची सुकन्या चि. सौ.कां. नेहा हिचा शुभविवाह सौ. लताबाई बालासाहेब देशमुख रा. डोंगरगाव ता. महागाव, जि. यवतमाळ यांचे ज्येष्ठ चिरंजीव सुरज यांचे समवेत आज रविवार, दि. १० मे २०२६ रोजी दुपारी १२.२४ वाजता सौभद्र मंगल कार्यालय, शिव मंदिर समोर, नांदेड येथे सानंद संपन्न होत आहे.
वधू–वरांस हार्दिक शुभेच्छा.

**–मुख्यसंपादक**


# कॉ. गंगारेड्डी बैनमवाड यांचे निधन

**किनवट (प्रतिनिधी)–** ज्येष्ठ कम्युनिस्ट नेते व तालुक्यातील बेल्लोरी येथील रहिवाशी कॉ. गंगारेड्डी बैनमवाड (वय ८०) यांचे शनिवार, दि. ९ मे रोजी सकाळी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, ५ मुली, २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. गंगारेड्डी बैनमवाड यांनी किनवट पालिकेचे उपाध्यक्षपद तसेच दीर्घकाळ कै. बळीराम पाटील महाविद्यालयाचे उपाध्यक्षपदही भूषविले.



# लोकअदालतीमध्ये महापालिकेने केला १ कोटी ४६ लक्ष मालमत्ता कर वसूल

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने दि. ९ मे रोजी पालिकेमध्ये राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. लोकअदालतीच्या अनुषंगाने मालमत्ताधारकांना आपल्या मालमत्ता कराविषयी असलेल्या तक्रारीच्या निवारणासाठी सहकार्य करून मालमत्ता कराचा भरणा करून महानगरपालिकेस सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले होते.



या राष्ट्रीय लोक अदालतीसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडून महानगरपालिकेच्या थकबाकीदार मालमत्ताधारकांना नोटीसा देण्यात आल्या होत्या. त्या अनुषंगाने दिनांक ९ रोजी सकाळी १०.३० वाजल्यापासून लोकअदालतीस सुरुवात करण्यात आली. राष्ट्रीय लोकअदालतीसाठी आलेल्या मालमत्ताधारकांना मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे व न्यायाधीश डी. एस. निंबाळकर (पॅनल प्रमुख), अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार यांनी कायदेविषयक बाबी समजावून सांगितल्या व मालमत्ताधारकांच्या तक्रारीचे निरसन केले. आज झालेल्या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये एकूण ७५३ मालमत्ताधारकांनी थकबाकीवरील शास्तीत ८०% सुट योजनेचा लाभ घेऊन एकूण तब्बल १ कोटी ४६ लक्ष एवढ्या रकमेचा मालमत्ता कर भरणा केला.

या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये प्रमुख जिल्हा न्यायाधीश एन. के. ब्रम्हे, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, सचिव विधी सेवा प्राधीकरण शरद देशपांडे, न्यायाधीश डी. एस. निंबाळकर, ॲड. समीउल्ला खान, अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार, सहायक आयुक्त मनीषा नरसाळे, सिस्टीम मॅनेजर सदाशिव पतंगे, मिर्झा फरहतुल्लाह बेग, रमेश चवरे, रावण सोनसळे, गौतम कवडे, निलावती डावरे, राजेश जाधव, न्यायालयीन कर्मचारी एम. बी. भोसीकर, एम. पी. सावरकर, बी. एन. मनसकरगेकर, सर्व क्षेत्रिय कार्यालयाचे वसुली पर्यवेक्षक, वसुली लिपीक व त्यांचे सहायक उपस्थित होते.

# धर्माबाद तालुक्यातील माष्टी येथे हाणामारी; १६ जणांवर ॲट्रॉसिटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी) –**धर्माबाद तालुक्यातील माष्टी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी केल्याच्या कारणावरून २ महिलांसह अन्य एकास विटा, काठीने जबर मारहाण केली. यात दोघेजण गंभीर जखमी झाले असून, उपचारासाठी तेलंगणा येथे हलविण्यात आले आहे. ही घटना दि. ८ मे रोजी घडली असून, याप्रकरणी कुंडलवाडी पोलीस ठाण्यात १६ आरोपींवर ॲट्रॉसिटी ॲक्टसह बेदम मारहाण केल्याप्रकरणी ९ रोजी सकाळी गुन्हे दाखल केले आहेत. दरम्यान मारहाण करणाऱ्या १६ पैकी ११ जणांना पोलिसांनी अटक केली आहे.

धर्माबाद तालुक्यातील माष्टी येथे डॉ. बाबासाहेव आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली होती. यावेळी गावातून मिरवणूक काढली. मात्र मिरवणूक रस्त्यावरून नेण्याच्या कारणावरून काही लोकांसोबत वाद झाला होता. या वादावरून ८ मे रोजी सायंकाळी सुनील पिराजी सोनकांबळे, मीराबाई प्रकाश भालेराव, शांताबाई माधवराव सोनकांबळे यांना रस्त्यावरून जात असताना पूर्वीचा राग मनात धरून काहींनी शिवीगाळ सुरू केली. याचा जाब विचारताच अन्य लोकांनी संगणमत करून मिरचीची पूड डोळ्यात, अंगावर टाकून विटांनी आणि लाकडाने जबर मारहाण केली. यात २ महिला गंभीर जखमी झाल्या. जखमींवर शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. आमच्या घरासमोर झेंडे लावता का, डॉ. बाबासाहेव आंबेडकर यांची जयंती साजरी करता का, असे म्हणत आरोपींनी जबर मारहाण केली अशी तक्रार सुनील पिराजी सोनकांबळे यांनी कुंडलवाडी पोलीस ठाण्यामध्ये दिली आहे. यावरून कुंडलवाडी ठाण्यात १६ जणांवर ॲट्रॉसिटी ॲक्ट कायद्यासह मारहाण केल्याप्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# घरफोडी करणारी आंतरजिल्हा टोळी जेरबंद



**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेडच्या वेगवेगळ्या तालुक्यात तसेच बुलडाणा जिल्ह्यातील देऊळगाव राजा येथे घरफोडी करून फरार असलेल्या टोळीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली. त्यांच्याकडून रोख रक्कम आणि एक दुचाकी जप्त केली आहे.

दि. ९ मे रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक साईनाथ पुयड व त्यांच्या पथकातील अंमलदार यांना गुप्त माहिती मिळाली की, जिल्ह्यात व इतर ठिकाणी घरफोडी व चोऱ्या करणारे आरोपी हे संशयीतरीत्या मोटारसायकलवर बसून त्यांचे ताब्यात चोरीतील नगदी रक्कम घेवून जात आहेत. त्यावरुन पोउपनि पुयड व त्यांचे टिमने माहिती मिळाल्याप्रमाणे पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण हद्दीत मोदी ग्राऊंड येथे जाऊन नमूद आरोपीतांपैकी आरोपी दीपसिंग किशोरसिंग तिलपितिया (वय १९) आणि महेंद्रसिंग उर्फ सन्नी देवेंद्रसिंग भोसीवाले (वय १९ दोघे रा. सखोजीनगर नांदेड) यांना ताब्यात घेवून विचारपूस केली असता त्या दोघांनी यातील आरोपी जोगिंदरसिंग टाक उर्फ चव्हाण रा. वसमत जि. हिंगोली याच्या मदतीने लोहा, कंधार, हिमायतनगर, विमानतळ, नांदेड ग्रामीण व पो.स्टे. देऊळगावराजा जि. बुलडाणा अशा विविध ठिकाणी चोरी व घरफोडी केल्याबाबत कबुली दिली.

# पदोन्नतीपूर्वी शिक्षक समायोजनाला शिक्षक संघटनांचा विरोध

**नांदेड (प्रतिनिधी) –**जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाकडून उन्हाळी सुट्टीच्या कालावधीत अतिरिक्त शिक्षक समायोजन प्रक्रिया राबविण्याचे आदेश देण्यात आल्याने शिक्षक संघटना व शिक्षकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. शिक्षण विभागाने दि. ७ मे २०२६ रोजी जारी केलेल्या आदेशानुसार १४ मेपूर्वी तालुकास्तरावरील समायोजन पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

दरम्यान, राज्यभर जनगणनेची तयारी सुरू असून, १४ मेपासून प्रत्यक्ष जनगणना कार्य सुरू होणार आहे. अशा परिस्थितीत शिक्षकांवर आधीच प्रशासकीय कामांचा मोठा ताण असताना समायोजन प्रक्रिया राबविणे योग्य नसल्याचा सवाल शिक्षक संघटनांकडून उपस्थित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासनाने यावर्षी विविध विभागांच्या बदल्या स्थगित केल्या असताना शिक्षण विभाग मात्र घाईघाईने समायोजन प्रक्रिया राबवत असल्याने शिक्षकांमध्ये संभ्रम आणि असंतोषाचे वातावरण आहे. जिल्ह्यात मुख्याध्यापक, शिक्षण विस्तार अधिकारी तसेच केंद्रप्रमुख यांच्या मोठ्या प्रमाणावर जागा रिक्त आहेत. मुख्याध्यापक पदांच्या सुमारे ३०० जागा रिक्त असल्याने प्रथम पदोन्नती प्रक्रिया राबवून नंतरच समायोजन करावे, अशी मागणी शिक्षक संघटनांकडून होत आहे.

या संदर्भात नांदेड जिल्ह्यातील सुमारे ६० शिक्षकांनी छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) खंडपीठात याचिका दाखल केली. रिट याचिका क्रमांक ३९८० /२०२६ असून पदोन्नतीशिवाय समायोजन प्रक्रिया राबविणे अन्यायकारक असल्याचा मुद्दा न्यायालयात मांडण्यात आला आहे.

दरम्यान, महाराष्ट्र शासन शिक्षण संचालनालय यांनी दि. ६ मे २०२६ रोजी जारी केलेल्या पत्रानुसार मुंबई उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ येथे दाखल रिट याचिका क्र. ३१९८/२०२५ संदर्भात माध्यमिक शिक्षकांच्या समायोजन प्रक्रियेला जैसे थे ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. न्यायालयाच्या पुढील आदेशापर्यंत संबंधित शाळांमध्ये सद्यस्थिती कायम ठेवावी तसेच न्यायालयाच्या निर्देशांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे प्राथमिक शिक्षक समायोजन प्रक्रियेबाबतही शिक्षक संघटनांनी प्रशासनाने सावध भूमिका घ्यावी, अशी मागणी केली आहे.

अंदाज समितीचे सदस्य सतीश चव्हाण यांच्या उपस्थितीत शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व शिक्षक संघटनांच्या प्रतिनिधींची बैठक पार पडली होती. या बैठकीत पदोन्नतीनंतरच समायोजन करण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आल्याचा दावा शिक्षक संघटनांनी केला आहे. मात्र प्रत्यक्षात प्रशासनाने समायोजन प्रक्रिया सुरू केल्याने शिक्षकांमध्ये नाराजी वाढली आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड–(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com

# चंदेरी


## तब्बूने दिला होता ‘राजा शिवाजी’ चित्रपटाला नकार!

अभिनेता रितेश देशमुखचा ‘राजा शिवाजी’ चित्रपट बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत आहे. चित्रपटाला चांगला प्रतिसाद मिळत असून गेल्या ८ दिवसांत चित्रपटाने चांगली कमाई केली आहे. रितेश देशमुख दिग्दर्शित व जिनिलीया देशमुख निर्मित या ऐतिहासिक चित्रपटात मराठीसह हिंदीतीलही अनेक बडे कलाकार आहेत. अभिषेक बच्चन, संजय दत्त, विद्या बालन यांसारखे अनेक बॉलीवूड कलाकार या चित्रपटात महत्त्वपूर्ण भूमिकेत झळकत आहेत. महेश मांजरेकर, जीतेंद्र जोशी यांसारखे लोकप्रिय मराठी कलाकारसुद्धा आहेत. पण, तुम्हाला माहीत आहे का ‘राजा शिवाजी’मध्ये विद्या बालनने साकारलेल्या भूमिकेसाठी तिला पहिली पसंती नव्हती. तिच्या जागी बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्रीला पहिली पसंती होती. ‘राजा शिवाजी’ या चित्रपटात विद्या बालनने मोठ्या बेगमची भूमिका साकारली आहे. पण आधी हा रोल बॉलिवूड अभिनेत्री तब्बूला ऑफर करण्यात आला होता. तारखा जुळत नसल्यामुळे तब्बूने हा रोल नाकारला. त्यानंतर रितेशने विद्या बालनशी संपर्क साधला आणि ती लगेच या प्रोजेक्टमध्ये सहभागी झाली. आता विद्या बालनच्या अभिनयाचं खूप कौतुक होत आहे.



## अमिताभ बच्चन यांनी का सोडले होते राजकारण?

**दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील सुपरस्टार थलपती विजय राजकारणातील हुकुमी एक्का ठरला आहे. नुकताच राजकारणात आलेला विजय आता मुख्यमंत्री पदाकडे वाटचाल करतो आहे. त्याच्या पार्टीने मिळवलेले यश आणि त्याची लोकप्रियता केवळ तमिळनाडूपुरती मर्यादित नसून देशभरात चर्चेचा विषय ठरली आहे. मात्र, असाही एक काळ होता जेव्हा बिग बी अमिताभ बच्चन यांनी अफाट लोकप्रियतेवर राजकारणाचे मैदान मारले होते. मात्र, त्यांचा हा प्रवास अत्यल्प ठरला अन् ते पुन्हा सिनेविश्वाकडे वळाले.**



अमिताभ बच्चन यांनी अनेक दशके सिनेविश्वावर राज्य केले. त्यांची लोकप्रियता अफाट झाली होती. त्यांचा प्रत्येक चित्रपट चित्रपटगृहात धुमाकूळ घालत होता. मात्र, १९८३ मधील ‘कुली’ या चित्रपटाच्या सेटवर त्यांचा अपघात झाला आणि चाहत्यांना मोठा धक्का बसला. अमिताभ यांच्यासाठी संपूर्ण देश प्रार्थना करू लागला. रुग्णालयात बच्चन आपल्या जीवन-मरणाची झुंज देत असताना देशभरातील चाहत्यांनी त्यांच्यासाठी नवस बोलण्यास आणि प्रार्थना करण्यास सुरुवात केली. महिनाभरानंतर अमिताभ रुग्णालयातून बाहेर आले आणि चाहत्यांचा जीव भांड्यात पडला. आपला अभिनेता ही लढाई यशस्वीरित्या पूर्ण करून पुन्हा सज्ज झाला, अशी भावना चाहत्यांमध्ये निर्माण झाली. मुंबईच्या रस्त्यांवर त्यांची एक झलक पाहण्यासाठी लोकांचा जनसमुदाय लोटला होता, यावरून अमिताभ यांच्या लोकप्रियतेला कोणीही धक्का लावू शकत नाही हे सिद्ध झाले. मात्र, याच दरम्यान इंदिरा गांधी यांची हत्या झाली आणि राजीव गांधी यांनी पंतप्रधानपदाचा भार स्वीकारला. बच्चन यांच्या लोकप्रियतेमुळे बालमित्र राजीव गांधी यांनी मदतीची हाक दिली आणि अमिताभ यांची पाऊले राजकारणाकडे वळाली. अमिताभ बच्चन यांनी उत्तर प्रदेशमध्ये आपली जादू दाखवली आणि लोकप्रियतेच्या जोरावर अलाहाबाद (प्रयागराज) लोकसभा मतदारसंघातून विजयश्री खेचून आणली. राजकारणात नव्याने पाऊल ठेवलेल्या अमिताभ यांच्यासाठी हा विजय स्वप्नवत होता. मात्र, त्यांच्या या स्वप्नाला लवकरच ग्रहण लागले आणि याचे कारण ठरले पक्षांतर्गत गटबाजी आणि राजकारण. अमिताभ यांच्या लोकप्रियतेमुळे काही नेत्यांचे धाबे दणाणले. त्यांना अमिताभ यांची घोडदौड खटकू लागली आणि अमिताभ बच्चन यांच्याविरोधात राजकीय डाव सुरू झाले. अलाहाबादमध्ये अमिताभ बच्चन यांचे ‘हरवले आहेत’ पोस्टर्स लागू लागले. चित्रपटांमधून वेळ काढून ते दोन आठवडे जरी मदारसंघामध्ये दिसले नाही तरी काही नेते संपूर्ण शहरभर बच्चन यांचा चेहरा असलेले ‘हरवल्याचे’ पोस्टर्स लावत असत. वीर संघवी यांच्या ‘अ रूड लाईफ’ या आत्मचरित्रात नमूद केल्यानुसार, तत्कालीन अर्थमंत्री व्ही. पी. सिंह हे बच्चन यांच्या अलाहाबादमधील अति लोकप्रियतेमुळे अस्वस्थ होते. हा त्यांचा बालेकिल्ला असल्याचा त्यांचा समज होता. संघवी यांनी असेही लिहिले आहे की, पक्षातील ज्येष्ठ सदस्यांनी शहरावरील बच्चन यांची पकड कमकुवत करण्यासाठी एकामागून एक असे अनेक राजकीय डावपेच रचले होते. १९८७ मध्ये बच्चन हे ‘बोफोर्स घोटाळ्या’त अडकले आणि त्यांना मोठा राजकीय धक्का बसला. याचे पुरावे नसले तरी विरोधकांनी याचे भांडवल केले. वाढत्या टीकेमुळे आणि दबावामुळे अमिताभ बच्चन यांनी लोकसभा खासदारकीचा राजीनामा दिला आणि त्यांच्या राजकीय प्रवासाला ब्रेक लागला. नंतर ते या आरोपातून निर्दोष सुटले असले तरी अमिताभ बच्चन पुन्हा राजकारणाच्या वाट्याला गेले नाहीत.

## त्रिशा कृष्णनला व्हायचं होतं क्रिमिनल सायकॉलॉजिस्ट, किती आहे शिक्षण?

**तमिळ आणि तेलुगू चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री त्रिशा कृष्णन सध्या चर्चेत आहे. त्यामागचं कारण म्हणजे तिची आणि विजय थलपती यांची मैत्री. अभिनेत्री यापूर्वीसुद्धा तिच्या व्यावसायिक आणि खासगी आयुष्यामुळे चर्चेत आलेली आहे. पण, असं असूनही तिच्याबद्दलच्या अशा काही गोष्टी आहेत ज्या अनेकांना माहीत नाहीये. यापैकी एक म्हणजे खऱ्या आयुष्यात त्रिशा उच्चशिक्षित असून तिच्याकडे अनेक पदव्या आहेत.**



त्रिशाची वेगळी ओळख करून देण्याची गरज नाही. तिचा जन्म ४ मे १९८३ रोजी तमिळनाडूतील चेन्नई येथे झाला. तिने सुरुवातीचं शिक्षण सेक्रेड हार्ट मॅट्रिक्युलेशन स्कूलमध्ये घेतलं. त्यानंतर तिने चेन्नईतील इथिराज कॉलेज फॉर वुमनमधून बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशनमध्ये पदवी प्राप्त केली. मात्र, तिला क्रिमिनल सायकॉलॉजिस्ट बनायचं होतं, पण चित्रपटांमध्ये संधी मिळाल्यामुळे तिने पुढचं शिक्षण सोडलं. कॉलेजच्या काळातच तिने मॉडेलिंगला सुरुवात केली. मॉडेलिंग करत असताना त्रिशाला चित्रपटांच्या ऑफर्स मिळू लागल्या. तिने १९९९ साली छोट्या भूमिकेतून तमिळ चित्रपटसृष्टीत पदार्पण केलं. त्यानंतर हळूहळू तिने तमिळ आणि तेलुगू इंडस्ट्रीमध्ये स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. तिने अनेक लोकप्रिय अभिनेत्यांसह अनेक हिट चित्रपटांत महत्त्वपूर्ण भूमिका साकारल्या. यासह तिने हिंदीतही काम केलं आहे. त्रिशा तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळेही अनेकदा चर्चेत असते. २०१५ साली तिचा उद्योजक वरुण मनियनबरोबर साखरपुडा झाला होता, पण नंतर त्यांचं नातं तुटलं. या नात्याबद्दल त्रिशाने सांगितलं होतं की, तिला अभिनय सोडण्याची अट घातली गेली होती, त्यामुळेच तिने साखरपुडा मोडण्याचा निर्णय घेतला.

## त्रिशालाला केवळ या कारणासाठी यायचं होतं बॉलीवूडमध्ये... पण...



बॉलीवूडचा ‘खलनायक’ संजय दत्त याची थोरली मुलगी त्रिशाला दत्त फिल्म इंडस्ट्रीपासून दूर आहे. ग्लॅमरस जगापासून लांब असलेल्या त्रिशालाने नुकताच तिच्या करिअर निवडीबाबत एक खुलासा केला. तिने सांगितलं की, लहानपणी तिला अभिनेत्री बनायची इच्छा होती, मात्र ती अभिनयाच्या आवडीमुळे नाही तर केवळ वडील संजय दत्त यांच्या जवळ राहता यावे यासाठी होती. आई रिचा शर्मा यांच्या निधनानंतर परदेशात वाढलेल्या त्रिशालाला वडिलांच्या प्रेमाची ओढ होती. आज त्रिशाला मानसिक आरोग्याच्या क्षेत्रात स्वतःचे वेगळे नाव कमावत आहे. १९८८ मध्ये जन्मलेली त्रिशाला ही संजय दत्त आणि त्याची पहिली पत्नी रिचा शर्मा यांची मुलगी आहे. १९९६ मध्ये रिचा यांच्या निधनानंतर त्रिशाला अमेरिकेत तिच्या आजी-आजोबांकडे लहानाची मोठी झाली. ‘इन्साईड थॉट्स आऊट लाउड’ या पॉडकास्टमध्ये तिला विचारण्यात आलं की, तुला कधी बॉलीवूडमध्ये काम करावं वाटलं का? त्यावर ती म्हणाली, की लहान असताना मी याबद्दल विचार केला होता. पण मला अभिनेत्री बनायचं होतं. कारण मला अभिनय आवडत होता, असं नाही तर मला फक्त माझ्या वडिलांच्या जवळ राहायचं होतं. वडिलांनी आयुष्यात खूप चढ-उतार पाहिले आहेत. त्यांनी मला विचारलं, ही खरंच तुझी आवड आहे का? तुला मनापासून या क्षेत्रात यावं वाटतं का? मी त्यांना सांगितलं की, मला फक्त तुमच्याबरोबर जास्त वेळ घालवायचा आहे. त्यावर ते म्हणाले, ‘तुला नेमकी कशाची आवड आहे, त्याबद्दल आपण बोलू आणि त्या क्षेत्रात तू पुढे जा. तू अमुक एका व्यक्तीची मुलगी आहेस म्हणून तू थेट ए-लिस्ट अभिनेत्री बनशील किंवा तुला खूप ऑफर्स येतील, असं अजिबात नाही. त्रिशालाची आई रिचा शर्मा यांचे १९९६ मध्ये ब्रेन कॅन्सरमुळे निधन झालं होतं. त्यानंतर संजय दत्तने १९९८ मध्ये रिया पिल्लई यांच्याशी लग्न केलं, पण २००८ मध्ये त्यांचा घटस्फोट झाला. २००८ पासून तो मान्यता दत्तबरोबर आहे. २०१० मध्ये त्यांना शाहरान आणि इक्रा ही जुळी मुलं झाली.

## माधुरी दीक्षितच्या नवऱ्याने का सोडली अमेरिकेतील नोकरी?

**अभिनेत्री माधुरी दीक्षितने १९९९ मध्ये डॉ. श्रीराम नेनेंशी लग्न केलं. या दोघांचा विवाहसोहळा अमेरिकेत मराठमोळ्या पद्धतीत पार पडला होता. खरंतर, नेनेंचा जन्म लंडनमध्ये झाला आणि त्यानंतर ते आपल्या कुटुंबासह अमेरिकेत राहायला आले. याचठिकाणी त्यांनी आपलं वैद्यकीय शिक्षण सुद्धा पूर्ण केलं. लग्नानंतर माधुरी देखील अमेरिकेत शिफ्ट झाली. अनेक वर्षे अमेरिकेत राहिल्यावर या जोडप्याने २०११ मध्ये कायमस्वरुपी भारतात परतण्याचा निर्णय घेतला.**



डॉ. श्रीराम नेनेंनी अमेरिकेतील हार्ट सर्जनची नोकरी सोडून भारतात येण्याचं ठरवलं, तेव्हा त्यांचे आई-बाबा सुरुवातीला प्रचंड नाराज झाले होते. डॉ. श्रीराम नेने सांगतात, की माझ्या आई-बाबांनी मला सुरुवातीलाच सांगितलं होतं की, तू एकतर डॉक्टर हो किंवा इंजिनिअर हो, अन्यथा आम्ही तुझ्या शिक्षणासाठी खर्च करणार नाही. माझे आई-बाबा आधीच्या पिढीतील असल्याने साहजिकच त्यांची विचारसरणी त्यावेळी थोडी वेगळी होती. त्यानंतर मी वॉशिंग्टन विद्यापीठात अंडरग्रॅजुएट मेडिसिन प्रोग्राममध्ये प्रवेश घेतला. त्याठिकाणी शिक्षण पूर्ण करून युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्नियामध्ये प्रवेश घेतला. तिथे मी माझं जनरल आणि व्हॅस्क्युलर सर्जरीचं शिक्षण पूर्ण केलं. पुढे, मग फ्लोरिडा विद्यापीठात मी प्रॅक्टिस सुरू केली. यानंतर डॉ. श्रीराम नेनेंनी अमेरिकेत अनेक वर्षे काम केलं. मात्र, काही वर्षांनी त्यांनी हार्ट सर्जनची नोकरी सोडण्याचा निर्णय घेतला. परदेशातील नोकरी सोडून त्यांनी वैद्यकीय सल्लागार व उद्योजक म्हणून काम करण्यास सुरुवात केली, ते २०११ मध्ये भारतात आले. हा निर्णय त्यांच्या आई-वडिलांना म्हणजेच माधुरीच्या सासू-सासऱ्यांना पटला नव्हता. यावर नेने सांगतात, की हार्ट सर्जनची नोकरी सोडणं. हा खूप मोठा निर्णय होता. कित्येकांचं हे स्वप्न असतं, त्यामुळे या निर्णयावर तेव्हा माझे आई-वडील नक्कीच खूश नव्हते. पण, हळूहळू मी आता जे-जे काही करतोय, वैद्यकीय क्षेत्रात सल्लागार म्हणून काम करतोय हे सगळं पाहून त्यांना आता हा निर्णय पटलेला आहे. असंख्य लोकांसाठी सल्लागार म्हणून काम करणं हे माझं स्वप्न होतं म्हणून मी नोकरी सोडण्याचा निर्णय घेतला. पारंपरिक आरोग्य सेवा महत्त्वाच्या असतात पण, त्याच्या जोडीने आपण तंत्रज्ञानाच्या साथीने लोकांना घरबसल्या देखील अनेक माहिती पुरवू शकतो असा विचार माझ्या मनात आला. मग युट्यूब चॅनेल सुद्धा सुरू केलं, असे ते म्हणाले. डॉ. नेनेंचं स्वतःचं युट्यूब चॅनेल सुद्धा आहे. यावर ते अनेक हेल्दी रेसिपीजचे व्हिडीओ बनवून शेअर करत असतात.

## ऋषी कपूर यांच्या लेकीचे 45 व्या वर्षी बॉलीवूडमध्ये पदार्पण



**ऋषी कपूर यांची मुलगी रिद्धिमा कपूर वयाच्या ४५ व्या वर्षी ‘दादी की शादी’ या चित्रपटातून बॉलीवूडमध्ये दमदार पदार्पण करणार आहे. वडिलांच्या विरोधामध्ये चंदेरी दुनियेपासून लांब राहिलेली रिद्धिमा आपल्या मुलीसह पदार्पण करणार आहे. वय हा फक्त आकडा असून स्वप्ने पूर्ण करण्यासाठी त्याचे बंधन नसते हे तिने सिद्ध केले.**

बॉलीवूडमधील अभिनयाचा वारसा जपणारे कुटुंब म्हणून कपूर घराणे मानले जाते. सिनेविश्वात कपूर कुटुंबाच्या चार पिढ्या प्रभावशाली आणि यशस्वी करिअर घडवत आहेत. पृथ्वीराज कपूर यांच्यापासून सुरू झालेला हा प्रवास राज कपूर, शम्मी कपूर व शशी कपूर यांनी यशस्वीरीत्या सांभाळला. त्यानंतर रणधीर, राजीव व ऋषी कपूर यांनी प्रेक्षकांची मने जिंकली, तर करिश्मा कपूर, करीना कपूर व रणबीर कपूर यांनी तर बॉलीवूडचा काळ गाजवला आणि आजही त्यांची जादू कायम आहे. नुकतीच कपूर घराण्यात सामील झालेली आलिया भट्ट यशाच्या शिखरावर आहे. अशातच आता आणखी एक कपूर बॉलीवूडमध्ये दमदार पदार्पण करणार आहे आणि ती म्हणजे रिद्धिमा कपूर. वयाच्या ४५ व्या वर्षी ऋषी कपूर आणि नीतू कपूर यांची कन्या रिद्धिमा बॉलीवूडमध्ये पदार्पण करणार आहे. टीव्ही आणि ओटीटी शोमध्ये सामील झाल्यामुळे चर्चेत आलेली रिद्धिमा आता सिनेविश्व गाजवण्यास सज्ज झाली आहे. ‘दादी की शादी’ या चित्रपटातून रिद्धिमा पदार्पण करणार आहे. वडिलांच्या विरोधामुळे चंदेरी दुनियेपासून दूर राहिलेली रिद्धिमा आता दमदार पदार्पण करणार आहे. रिद्धिमासह तिची मुलगी समारादेखील पहिल्यांदाच पडद्यावर झळकणार असल्याने या चित्रपटाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. अनेकदा स्त्री कलाकार लग्नानंतर अभिनयाचे क्षेत्र सोडून कुटुंबाला प्राधान्य देत करिअर सोडून देतात. मात्र, रिद्धिमाने चाळिशीनंतर चित्रपटांमध्ये काम करण्याचा निर्णय घेतला. रिद्धिमा ही कपूर घराण्यातील बॉलीवूडमध्ये सर्वांत उशिरा पदार्पण करणारी अभिनेत्री ठरणार आहे. कपूर घराण्यातील असूनही तिने चित्रपटांमध्ये काम का केले नाही याचे कारण ऋषी कपूर यांच्या ‘खुल्लम खुल्ला’ या पुस्तकात सांगितले आहे. नीतू कपूर यांनी लिहिले आहे की, रिद्धिमाला माहीत होतं की तिने अभिनेत्री व्हायचं ठरवलं तर तिचे वडील आत्महत्या करतील. ऋषी कपूर आपल्या पत्नी आणि मुलीबद्दल प्रचंड ओव्हर प्रोटेक्टिव्ह होते. रिद्धिमामध्ये उत्तम अभिनय कौशल्य आणि सौंदर्याची खाण असूनही केवळ वडिलांच्या नाराजीपोटी ती ज्वेलरी आणि फॅशन डिझायनिंगकडे वळाली, असे नीतू कपूर यांनी लिहिले आहे. रिद्धिमाने आता म्हटले आहे, की हे खरोखरच एखाद्या स्वप्नासारखे वाटत आहे. सर्व काही पुन्हा मूळ पदावर येऊन एक वर्तुळ पूर्ण झाल्यासारखे वाटत आहे. मला खात्री आहे की, माझे वडील (ऋषी कपूर) सदैव माझ्या पाठीशी आहेत. मी हाती घेतलेल्या प्रत्येक कामात त्यांचे आशीर्वाद माझ्या पाठीशी कायम असतात. याच विचारातूनच मला प्रेरणा मिळते. आयुष्याच्या या टप्प्यावर एका पूर्णपणे नवीन विश्वात पाऊल टाकणे, हे माझ्यासमोर सर्वांत मोठे आव्हान होते. कोणतीही नवी सुरुवात करण्यात एक प्रकारची असुरक्षितता असते; पण त्याच वेळी त्याबद्दल प्रचंड उत्साहही वाटत असतो, अशा भावना व्यक्त केल्या. ‘दादी की शादी’ हा हिंदी कौटुंबिक विनोदी चित्रपट शुक्रवारी (८ मे) प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटात विधवा आजीच्या पुनर्विवाहाची कथा रंगवण्यात आली आहे.

## अरबाज खानने 6.5 कोटींत विकला जुना फ्लॅट!

सलमान खानचा भाऊ अरबाज सलीम खानने लोखंडवाला कॉम्प्लेक्समधील रनवाल एलिगंट प्रकल्पातील आपला १,३६९ चौरस फुटांचा फ्लॅट विकला आहे. सीआरई मॅट्रिक्सकडून मिळालेल्या मालमत्ता नोंदणीच्या कागदपत्रांनुसार, अरबाजने मुंबईतील अंधेरी पश्चिम येथील या फ्लॅटचा सौदा ६.५ कोटी रुपयांत केला. या व्यवहाराची नोंदणी मंगळवारी (५ मे) झाली. कागदपत्रांनुसार, हा फ्लॅट रनवाल एलिगंट प्रकल्पाच्या टॉवर बीमध्ये आहे. या फ्लॅटसाठी दोन गाड्यांसाठी पार्किंगची जागा आहे. खरेदीदारांनी या व्यवहारासाठी ३९ लाख रुपयांचे मुद्रांक शुल्क भरले आहे. रनवाल एलिगंट प्रकल्प इन्फिनिटी मॉलजवळ आहे. अरबाज खानने अद्याप या प्रकरणी कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. अरबाज खान मुंबईत आपल्या रिअल इस्टेट मालमत्तांचा विस्तार करत आहे. त्याची पत्नी, शूरा खानदेखील त्याला यात पूर्ण पाठिंबा देते. एका अहवालानुसार, अरबाज खानची एकूण संपत्ती ५०० कोटी रुपये असून, चित्रपट निर्मिती हा त्याच्या उत्पन्नाचा मुख्य स्रोत आहे. अरबाजने अभिनेता म्हणून फारशा चित्रपटांमध्ये काम केलेले नाही, परंतु तो चित्रपट निर्मिती आणि व्यवसायातून भरीव उत्पन्न मिळवतो.

## ‘3 इडियट्स’च्या सीक्वेलमध्ये विकी कौशल?

**अभिनेता विकी कौशल शेवटचा २०२५ मधील ‘छावा’ या चित्रपटात दिसला होता. अशातच आता अभिनेता एका गाजलेल्या चित्रपटाच्या सीक्वलमध्ये झळकणार आहे. हा चित्रपट म्हणजे आमिर खानची मुख्य भूमिका असलेला ‘३ इडियट्स’ असल्याची चर्चा सुरू आहे.**



आमिर खानने नुकतीच याबद्दल माहिती दिली आहे. अभिनेत्याने सांगितलं की दिग्दर्शक राजकुमार हिराणी या चित्रपटाच्या पात्रांवर काम करत आहेत. ‘३ इडियट्स’ हा चित्रपट प्रदर्शित होऊन आता दशकाहून अधिक काळ झाला असला, तरी त्याची लोकप्रियता अजूनही कायम आहे. विकी कौशलने याआधी राजकुमार हिरानी यांच्याबरोबर ‘संजू’ आणि ‘डंकी’मध्ये काम केलं आहे. आता ‘३ इडियट्स’च्या सीक्वेलची कथा त्याला खूप आवडली आहे. या माध्यमानुसार सीक्वेलमध्ये विकीच्या पात्रामुळे आमिर खान आणि इतर मूळ पात्रांबरोबर एक नवीन आणि भावनिक ट्विस्ट येणार आहे. उल्लेख केलेल्या माध्यमाच्या वृत्तानुसार विकी कौशलने आमिर खानबरोबर काम करण्याची आणि या चित्रपटातील इतर कलाकारांबरोबर स्क्रीन शेअर करण्याबद्दल उत्सुकता व्यक्त केली आहे. विकी, आमिर आणि राजकुमार हिरानी यांच्या यासाठी अनेक भेटीही झाल्याचं म्हटलं जातं. विकीने ‘३ इडियट्स २’ मधील चौथ्या पात्रासाठी होकार दिल्याचं म्हटलं जातं. मात्र, संपूर्ण टीमचं वेळापत्रक जुळल्यानंतरच हा प्रोजेक्ट पुढे जाईल, अशी माहिती समोर आली आहे. २००९ मध्ये प्रदर्शित झालेल्या ‘३ इडियट्स’ या चित्रपटात आर.माधवन, शर्मन जोशी आणि करीना कपूर यांसारख्या कलाकारांची ऑनस्क्रीन मैत्री आणि केमिस्ट्री पाहायला मिळाली होती. त्यामुळे आता या चित्रपटाच्या सीक्वलमध्ये काय पाहायला मिळणार याबद्दल प्रेक्षकांमध्येही उत्सुकता असेल.

# स्त्री रुग्णालयात 'एक पाऊल थॅलेसेमिया मुक्तीकडे' अभियान व संकल्प सप्ताह उत्साहात



**नांदेड (प्रतिनिधी)** –राज्य शासनाच्या आरोग्य विभागाच्या वतीने राज्यभर राबविण्यात येत असलेल्या 'एक पाऊल थॅलेसेमिया मुक्तीकडे' या अभियानाचा समारोप नांदेड येथील स्त्री रुग्णालयात करण्यात आला. या अभियानाचा भाग म्हणून दि. १ ते ८ मे या कालावधीत 'संकल्प सप्ताह' साजरा करण्यात आला. ज्यामध्ये विविध आरोग्यविषयक उपक्रम राबवून थॅलेसेमिया आजाराबाबत जनजागृती करण्यात आली.

सप्ताहाचा शुभारंभ दि. १ मे रोजी स्त्री रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुनील पल्लेवाड यांच्या अध्यक्षतेखाली आणि जिल्हा रुग्णालय नांदेडच्या विकृती शास्त्रज्ञ डॉ. पद्मावती येडपलवार यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. यावेळी रुग्णालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अभियानाची प्रमुख वैशिष्ट्ये–

अभियानांतर्गत गरोदर माता तसेच १८ ते ३५ वयोगटातील तरुण–तरुणींची थॅलेसेमिया तपासणी करण्यात आली. संशयित रुग्णांची विशेष तपासणी करून त्यांना पुढील उपचारासाठी मार्गदर्शन करण्यात आले.

थॅलेसेमियाग्रस्त मुले आणि त्यांच्या पालकांना या आजारावरील उपचार, घ्यावयाची काळजी आणि आहाराबाबत तज्ज्ञ डॉक्टरांनी सविस्तर माहिती दिली.

मोफत सेवेअंतर्गत रुग्णालयामार्फत थॅलेसेमिया रुग्णांना मोफत वैद्यकीय सेवा आणि नियमित रक्तपुरवठा उपलब्ध करून दिला जात आहे.

या सप्ताहात रक्तदान शिबिरे, शाळा – महाविद्यालयांमध्ये जनजागृतीपर व्याख्याने आणि प्रसारमाध्यमांच्या मदतीने थॅलेसेमियामुक्तीचा संदेश घराघरांत पोहोचवण्यात आला.

'थॅलेसेमियामुक्त महाराष्ट्र' हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून हे अभियान यशस्वी करण्यासाठी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. बुट्टे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुनील पल्लेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. येडपलवार, डॉ. मोहिनी पाटील, दत्तात्रय भोसले, ज्योती गादेकर, दीपाली इंगोले यांच्यासह स्त्री रुग्णालयातील सर्व वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

थॅलेसेमिया हा प्रतिबंधात्मक आजार असून, वेळीच तपासणी आणि जनजागृती केल्यास आपण येणारी पिढी या आजारापासून मुक्त ठेवू शकतो. नागरिकांनी या अभियानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.

## जैन अल्पसंख्याक विकास आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी यांचा दौरा



**नांदेड (प्रतिनिधी)**– जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष (राज्यमंत्री) व सदस्य ललित गांधी हे रविवार, दि. १० मे २०२६ रोजी नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहील.

रविवार, दि. १० मे २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथून खाजगी वाहनाने मध्यरात्री २ वा. नांदेड शासकीय विश्रामगृह येथे आगमन. सकाळी ९ वा. जैन श्वेतांबर मंदिर नांदेड येथे दर्शनार्थ भेट. सकाळी ९.३० वा. शासकीय वाहनाने उमरी रेल्वे स्टेशनकडे प्रयान व जैन मंदिर दर्शन. सकाळी ११ वा. पुरातन जैन मंदिर जुन्नी येथे सदिच्छा भेट. दुपारी १२ वा. धर्माबाद जैन मंदिर येथे सदिच्छा भेट. दुपारी २ वा. धर्माबाद येथून नांदेड शासकीय विश्रामगृहाकडे प्रयान. सायं. ५ वा. सकल जैन समाज आयोजित सन्मान समारोह उपस्थिती, स्थळ– नियोजन भवन जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड. रात्री १० वा. नांदेड रेल्वे स्टेशन येथून मुंबईकडे प्रयान करतील.

# आर्थिक गैरव्यवहारात अडकलेल्या किनवट बाजार समितीच्या कर्मचाऱ्यांचे ७ वर्षांपासून वेतन थकले

**किनवट (प्रतिनिधी)** –बँकेत असलेली एफडी तोडून दीड कोटी रुपयांचा कथित गैरव्यवहार झालेल्या किनवट बाजार समितीच्या एकूण ८ कर्मचाऱ्यांचे वेतन गत ७ वर्षांपासून थकले आहे. शिवाय कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यातही रक्कम भरणा करण्यात आली नसल्याने कर्मचारी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत.

किनवट बाजार समितीचे सभापती गजानन मुंडे व सचिव रवी राठोड यांनी बाजार समितीच्या मालकीची जवळपास दीड कोटी रुपयांची फिक्स डिपॉझिट तोडून रकमेचा अपहार केल्याची तक्रार बाजार समितीच्या उपसभापतींसह १७ संचालकांनी सहायक निबंधक व इतर संबंधितांकडे केली आहे. या पार्श्वभूमीवर बाजार समितीस भेट देऊन माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता बाजार समितीच्या कार्यालयात सेवकाखेरीज सचिव अथवा एकही कर्मचारी उपस्थित नव्हता. याबाबत विचारणा केली असता, बाजार समितीचे सचिव रवी राठोड हे जवळपास १५ दिवसांपासून कार्यालयात येत नसल्याचे सांगण्यात आले. उपस्थित एका कर्मचाऱ्याकडून माहिती घेतली असता बाजार समितीच्या सेवारत ८ कर्मचाऱ्यांना सन २०१९ पासून पगार मिळाला नसल्याचे सांगण्यात आले.एकीकडे नियमित पगार मिळत नसताना कर्मचाऱ्यांची भविष्य निर्वाह व इतर निधी खात्यातही 'अंधार' असल्याचे दिसून आले.

निवृत्ती वेतन योजना, उपसमिती पुणे यांच्याकडे सन २०१९ नंतर कर्मचाऱ्यांच्या नावे रक्कमच भरली नसल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. जिथे नियमित वेतनच मिळत नाही तिथे कर्मचाऱ्यांच्या निवृत्ती वेतन व इतर लाभाचे काय, असा प्रश्न एका निवृत्त कर्मचाऱ्याने उपस्थित केला आहे. सन १९५५ मध्ये स्थापन झालेल्या बाजार समितीच्या गौरवशाली इतिहासाचा अस्त झाला असून, एकंदरीत डबघाईचा कारभार पाहाता बाजार समितीत 'राम' राहिला नसल्याचे दिसून येत आहे.

**गैरव्यवहाराची चौकशी होणार –सहायक निबंधक**


किनवट बाजार समितीचे सभापती व सचिवांनी संगनमताने बाजार समितीच्या रकमेचा गैरव्यवहार केल्याची तक्रार उपसभापती तसेच संचालकांनी आपल्याकडे दिली आहे. यासंदर्भात संबंधितांना नोटिसा बजावून या संवेदनशील प्रकरणाची सखोल चौकशी करून जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था नांदेड यांच्याकडे आठवडाभराच्या आत अहवाल सादर करण्यात येईल, अशी माहिती किनवट येथील सहायक निबंधक दीपक गायकवाड यांनी प्रस्तुत प्रतिनिधीशी बोलताना दिली.

## श्री शिवाजी हायस्कूल (उर्दू/मराठी) सेमी इंग्रजीचा १०० टक्के निकाल

**कंधार (प्रतिनिधी)**– शालांत प्रमाणपत्र परीक्षा २०२६ चा निकाल ८ मे २०२६ रोजी जाहीर झाला. त्यामध्ये श्री शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय (उर्दू/मराठी) कंधार या शाळेचा सेमी माध्यम निकाल १०० टक्के लागला आहे. या परीक्षेत शाळेचे एकूण विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यामध्ये ९० टक्केपेक्षा जास्त गुण घेणारे ११ विद्यार्थी तर विशेष प्राविण्य ३७ विद्यार्थी तर ६० टक्केच्या वर ९५ विद्यार्थी आहेत.

शुक्रवार, दि. ८ मे रोजी दहावी शालांत प्रमाणपत्र परीक्षा २०२६ चा निकाल लागला असून, यामध्ये प्रतीक्षा लक्ष्मी संग्राम मुसळे ही विद्यार्थिनी ९८.८९ टक्के गुण घेऊन कंधार तालुक्यात प्रथम आली आहे. संस्कृत विषयात १०० गुण मिळवणारी तालुक्यात एकमेव विद्यार्थिनी. द्वितीय क्रमांकावर कु. प्रतीक्षा कोमल सूर्यकांत गुट्टे–९६.८०, तृतीय–परभणीकर अवधुत सचिन–९५.२०, कु.घाटोळ अनुष्का भास्करराव –९४.६० टक्के, कु. सृष्टी जनार्धन केंद्रे–९३.८० टक्के, कु. गोरे वैष्णवी भागवत–९३.६०टक्के, कु. सायली यादव पेठकर–९२.००टक्के, कु. कार्तिकी बापुजी लाडेकर – ९१.२०टक्के, कु. सुप्रिया नाथराक केंद्र–९०.८० टक्के, व्यंकटेश विष्णुदास मुंडे–९०.२०टक्के, माहेरा फातेमा खलील अहेमद– ९०.२० टक्के. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ पुरुषोत्तम धोंडगे, संस्था सचिव मा. आमदार भाई गुरुनाथराव कुरुडे, सहसचिव ॲड. मुक्तेश्वर धोंडगे, शालेय समिती अध्यक्ष प्रा. लिलाताई आंबटवाड, मुख्याध्यापक मुरलीधर घोरबांड उपमुख्याध्यापक गजानन मोर, पर्यवेक्षक सुरेश इरलवाड, व जीवन लाडेकर,वर्ग शिक्षक अझर बेग, मुख्यलिपीक पंडीत लाडेकर सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# पावन भिक्षा ग्रंथाचे प्रकाशन



**नांदेड (प्रतिनिधी)**–ज्येष्ठ समर्थ भक्त शीलाताई देशमुख यांनी समर्थ रामदास स्वामीकृत आणि पू. स्वामी गोविंद देव गिरी यांनी अनुवादित केलेल्या पावन भिक्षा दे दो राम या चौपाईवर केलेल्या विवेचनात्मक ग्रंथाचे प्रकाशन पुणे येथील वेदश्री तपोवन येथे डॉ. विजय लाड आणि सौ. विद्याताई लव्हेकर यांच्या हस्ते ७ मे रोजी झाले.

श्रमाने मिळवलेली पवित्र भिक्षा अंगिकारून राष्ट्रोद्धासाठी आपले जीवन समर्पित करून मिळालेल्या नरदेहाला पावन कसे करावे हे सूत्र रामदास स्वामींचे वाङ्.मय आपल्याला शिकवते, असे मत या प्रसंगी दासबोध सखोल अभ्यास फाउंडेशनचे संचालक तथा सुंदर मठ, शिवथरघळ येथील विश्वस्त डॉ. विजय लाड यांनी व्यक्त केले.

या वेळी शीलाताई देशमुख यांची अमृत महोत्सवानिमित्त धान्य आणि ग्रंथ तुला करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अनिरुद्ध देशमुख, अंबरीश देशमुख, सिंधू देशपांडे, सुधांशु रथ, अपर्णा देशमुख, स्वानंदी रथ आणि ज्योती प्रसाद देशमुख यांनी परिश्रम घेतले.

## एकलव्य इंटरनॅशनल स्कूल व ज्युनिअर कॉलेजची १०० टक्के निकालाची परंपरा कायम

**नांदेड (प्रतिनिधी)**– अर्धापूर तालुक्यातील एकलव्य इंटरनॅशनल स्कूल व ज्युनिअर कॉलेज, बामणी या शाळेतील दहावीच्या शालांत परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला आहे. या शाळेने निकालाची परंपरा कायम राखली आहे.

या शाळेतील स्नेहल भालेराव या विद्यार्थिनीने ९४:६० टक्के गुण प्राप्त करून शाळेत सर्वप्रथम येण्याचा मान मिळविलो आहे. तर समृद्धी कपाळे ९३ टक्के, मृणाली सावते ८९:२० टक्के, ईश्वरी कल्याणकर ८४:४० टक्के, श्रावणी सोनाळे ८४:२० टक्के, मनोहर मेंडके ७४:८० टक्के, मोहमद कैफ ७२:४० टक्के तसेच सर्व विद्यार्थी प्रथमश्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

या यशस्वी निकालाबाबत संस्थेच्या अध्यक्षा सौ. सविता कंठेवाड यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. या यशाबद्दल संस्थेच्या सचिव डॉ. श्रद्धा कंठेवाड यांनी सर्व यशस्वी विद्यार्थी व शिक्षकांचे अभिनंदन करून एकलव्यच्या विद्यार्थ्यांनी स्पर्धात्मक परीक्षेतसुद्धा अशीच उत्तुंग झेप घ्यावी, असा आशावाद व्यक्त केला.

विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक तथा उद्योजक मारोती कंठेवाड तसेच सर्व संचालक, शाळेचे प्राचार्य रवीन्द्रन, उपप्राचार्य डॉ. सुनील काळे, शाळेचे जनसंपर्क अधिकारी भास्कर पाईकराव, प्रशासकीय विभागप्रमुख फयुम शेख, शाळेतील सर्व शिक्षक व कर्मचारी यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## दहावी परीक्षेत कुसुमताई माध्यमिक विद्यालय सिडकोचे घवघवीत यश

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– कुसुमताई माध्यमिक विद्यालय सिडको, नवीन नांदेड या विद्यालयाने यशाची परंपरा कायम राखत शैक्षणिक वर्ष २०२५–२०२६ मध्ये घेण्यात आलेल्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेला विद्यालयातून एकूण २७७ विद्यार्थी बसले होते, त्यापैकी २४५ पास झाले आहेत. त्यात विशेष प्रविण्यात –५६, प्रथम श्रेणीत ७२, द्वितीय श्रेणीत ७३ विद्यार्थी पास झाले आहेत. एकूण विद्यालयाचा निकाल ८८.४४ टक्के लागला आहे.

या शाळेतून प्रथम–व्यंकटेश राजे – ९८.४० टक्के, द्वितीय–श्रुतिका कासेवार –९५.२० तृतीय–शिवराज कौशल्ये, सोहम गुडेवार, सुमित राठोड – ९४.२० टक्के गुण घेऊन यश संपादन केले. या प्रसंगी संस्थेचे सचिव संभाजीराव बिरादार, प्राचार्या शशिकलाताई जाधव–बिरादार, पर्यवेक्षक शेख निजाम गवंडगावकर, उज्ज्वला सावते यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. तसेच १० वी वर्गाला शिकवणारे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि पालकांचेही अभिनंदन करण्यात आले.

## ज्ञान सरस्वती इंग्लिश स्कूलचा उत्तम निकाल

**नांदेड (प्रतिनिधी)** –देगलूर शहरातील ज्ञान सरस्वती इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज देगलूर या शाळेने यशाची परंपरा कायम राखत गेल्या १४ वर्षापासून १०० टक्के निकाल प्राप्त केला आहे.

देगलूर येथील या इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील संके आदर्श मिलिंद याने ९८.५० टक्के गुण मिळवून तालुक्यात प्रथम येण्याचा मान मिळविला आहे. या शाळेतील परबते गणेश भास्कर याने ९२.४० टक्के गुण मिळवून शाळेत द्वितीय आला आहे तर कुमारी श्रद्धा शंकर शिंदे व यश धम्मपाल कांबळे या दोघांनी ९२.२० टक्के गुण घेऊन शाळेतून तृतीय आला आहे.

# गोदावरी मनार पब्लिक स्कूलचा दहावीचा शंभर टक्के निकाल







**शंकरनगर (प्रतिनिधी)**– शैक्षणिक वर्ष फेब्रुवारी/मार्च २०२५–२६ मध्ये शासनाने कॉपीमुक्त अभियान घेतले होते. त्या अनुषंगाने कॉपीमुक्त वातावरणात घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेत शंकरनगर येथील इंग्रजी माध्यमाच्या गोदावरी मनार पब्लिक स्कूलने यंदाही उज्ज्वल यश संपादन करत सलग चोवीसाव्या वर्षी शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार इंग्रजी शिक्षण मिळावे या उद्देशाने माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर यांनी शंकरनगर येथे गोदावरी मनार पब्लिक स्कूलची स्थापना केली. संस्थेने मागील २४ वर्षांपासून सातत्याने शंभर टक्के निकालाची परंपरा जपत नांदेड जिल्ह्यात वेगळी ओळख निर्माण केली आहे.

यावर्षी दहावीच्या परीक्षेसाठी एकूण १३२ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विविध प्रकल्पांतर्गत सहभागी झालेल्या ११० विद्यार्थ्यांनीही उत्कृष्ट यश मिळवत शंभर टक्के निकाल कायम ठेवला.

विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये चिंतले अंबिका नागनाथ हिने ९४.४० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. श्रेयशी दिलीप भुसावळे हिने ९३.६० टक्के गुणांसह द्वितीय, तर शताशी महेश चक्रावार हिने ९२.६० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक, डाकोरे वैष्णवी ज्ञानेश्वर ९०.८०, पुयड रोशनी प्रल्हाद ९०.६० टक्के गुण घेतले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष तथा माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर, सचिव डॉ. मीनलताई निरंजन पाटील खतगावकर, प्राचार्य डी. पी. पांडेय यांनी अभिनंदन केले.

# वर्ल्ड बँकेच्या प्रतिनिधीसोबत महापौरांची बैठक

## मित्रा व वर्ल्ड बँकेच्या संयुक्त उपक्रमातून महापालिकेस निधी प्राप्तीसाठी प्रयत्न



**नांदेड (प्रतिनिधी)**– महानगर–पालिकेच्या पायाभूत सुविधांच्या विकासासाठी जागतिक बँक आणि मित्रा (MITR - Maharashtra Institution for Transformation) यांच्या संयुक्त विद्यमाने महत्त्वाचा निधी उपलब्ध होणार आहे. या प्रकल्पाबाबत नांदेडच्या महापौर कविता मुळे आणि जागतिक बँकेच्या प्रतिनिधींमध्ये नुकतीच एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीस उपमहापौर दीपकसिंह रावत, मुख्य लेखा व वित्त अधिकारी धनराज पांडे, शहर अभियंता सुमंत पाटील, वर्ल्ड बँकेचे प्रतिनिधी श्रीनिवासराव, अभिजित रॉय, श्रेष्ठा आने आदी उपस्थित होते.

'मित्रा' आणि जागतिक बँक यांच्या सहकार्याने राबवल्या जाणाऱ्या महा–स्ट्राईड आणि महाराष्ट्र लवचिकता विकास कार्यक्रम अंतर्गत हा निधी दिला जाणार आहे. या निधीचा वापर मुख्यत्वे शहरातील पाणीपुरवठा योजना (पाण्याचा पुनर्वापर), रस्ते विकास आणि मलः निसारण प्रणालीतील उद्भवणाऱ्या समस्यांचे निवारण करण्यासाठी केला जाईल. 'मित्रा' ही संस्था या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी नोडल एजन्सी (प्रकल्प व्यवस्थापन युनिट) म्हणून काम करणार आहे.

महापौरांनी जागतिक बँकेच्या अधिकाऱ्यांसोबत शहरातील प्रलंबित विकासकामांच्या प्रस्तावांवर सविस्तर चर्चा केली. यामध्ये प्रामुख्याने पाण्याचा पुनर्वापर, रस्ते विकास, मलःनिस्सारण अंतर्गत येणाऱ्या कामांचा प्रकल्प अहवाल तयार करुन निधी प्राप्तीसाठी प्रस्ताव सादर करण्याचे ठरविण्यात आले.


**कुत्रीचे पिल्ले विकणे आहे**

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८


# 'विमल इंग्लिश स्कूल'चा निकाल १०० टक्के

**भोकर (प्रतिनिधी)**– महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या सन २०२६ च्या एसएससी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, यात भोकर येथील विमल इंग्लिश स्कूलने शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. शाळेच्या या नेत्रदीपक यशामुळे संपूर्ण तालुक्यातून कौतुकाचा वर्षाव होत असून, विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

यावर्षी शाळेतून एकूण ३३ विद्यार्थी परीक्षेला बसले होते आणि सर्वच्या सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विशेष प्रावीण्य श्रेणीमध्ये २० विद्यार्थी, प्रथम श्रेणीत ९ विद्यार्थी, द्वितीय श्रेणीत ४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

शाळेतील कु. अंजली दत्तात्रय माने हिने ९८.४० टक्के गुण मिळवून भोकर तालुक्यात प्रथम येण्याचा बहुमान पटकावला आहे. इतर यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये कु. ईश्वरी उमाकांत कुऱ्हाडे ९२.४० टक्के, आदित्य संतोष करंदीकर ९१.६० टक्के, कु. तेजस्वीनी श्रीनिवासुलू बाडीकला: ९१ टक्के, शौर्य सतीश बच्चेवार ८८.६० टक्के, तिरुमल व्यंकटेश वर्षेवार ८७.६० टक्के, धनश्री भगवान हाके ८५.२०टक्के, तन्वी सदाशिव आडे ८४.२० टक्के, कार्तिक सदाशिव आडे ८३.८० टक्के, रितेश रमेश राठोड ८३.४०टक्के, नैतिक सचिन बोपेवार ८२.६० टक्के, सुजल दिलीप बच्चेवार ८२.४० टक्के आणि हर्ष आनंद चिंतावार ८०.६० टक्के गुण मिळविले.

तसेच श्रेयस नंदकिशोर पालकृतवार, मारोती त्रिमाकदार, पूर्वा घोगरे, सुबोध फुगले, खाजा अफझीन तौफीक इनामदार, श्रीकांत झुईकरे, कृष्णा, सूर्यवंशी, वामकृष्णा औधुतवार, सिद्धी गजानन मार्कटी, गौरी बोलेवार, आरुष जाधव, रितेश बोटलावार, वरुण गुंडमवाड, उमर फहीमोद्दीन पटेल, अब्दुल रहेमान मो. असलम, अनुष्का सुकुंतवाड, नोमान अब्दुल जमील मोमीन, आयमन युसूफ शेख, शिवप्रसाद जाटलावार आणि पूजा साईनाथ कुमारवाड या विद्यार्थ्यांनीही यश संपादन करून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

# इंदिरा गांधी हायस्कूलचे उज्ज्वल यश

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– दरवर्षीप्रमाणे याही वर्षी श्री शारदा भवन शिक्षण संस्था संचालित इंदिरा गांधी हायस्कूल सिडको नवीन नांदेड शाळेने शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०२६ मध्ये आपल्या उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखली.

शालांत परीक्षेत शाळेचा निकाल ९०.६६ टक्के लागला आहे. शाळेतील १८ विद्यार्थ्यांनी ९० टक्केच्या वर गुण संपादित केले असून, सर्वप्रथम येण्याचा मान कु. नंदिनी शशिकांत मालशेटवार ९६.२० टक्के, द्वितीय चि. प्रेम संदेश राजेवार ९५.४० टक्के, चि. प्रवीण पांडुरंग भालके ९५.४० टक्के व तृतीय चि. मनीष बालाजी देवरे ९५ टक्के असून, या शालांत प्रमाणपत्र परीक्षेत एकूण २५७ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यापैकी विशेष प्राविण्य ६९ प्रथम श्रेणीत ७८ द्वितीय श्रेणीत ५८ पास श्रेणीत २८ तर शाळेचे एकूण २३३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष खासदार तथा माजी मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य अशोकराव चव्हाण, उपाध्यक्षा माजी आमदार सौ. अमिता चव्हाण, सचिव माजी राज्यमंत्री डी. पी. सावंत, सहसचिव माजी प्राचार्य डॉ. रावसाहेब शेंदारकर, कोषाध्यक्ष ॲड. उदयराव निंबाळकर व सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.


**टी.सी. हरवली**

माझी राहीन सिद्दीका या नावाची बी.एससी. पासची टी.सी. रेल्वे स्टेशन ते देगलूर नाका ऑटो प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

**पत्ता. अमर कॉलनी, देगलूर नाका नांदेड–४३१६०२**
**मो.नं. ९९६०१८१२१२**



**जाहीर प्रगटन**

याद्वारे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे की, अर्जदार विष्णू गणेश भारती वय ५२ वर्षे रा. साकुर ता. माहूर ह. मु. भगवाननगर, नांदेड ता. जि. नांदेड मो. नं. ८२७५५१०५८९ यांनी या कार्यालयात त्यांचे नातीचे जन्म प्रमाणपपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म झालेल्याचे नाव कुहू रविंद्र पुरी वय ८३ रा. परतापूर पो. उकळी ता. मेहकर, जि. बुलडाणा ह. मु. साईनगर, भोईसर मुंबई ता. जि. मुंबई. सदर व्यक्तीचा स्पर्श स्पेशालिटी हॉस्पीटल एस.पी. ऑफीसच्या मागे, वजिराबाद नांदेड ता. जि. नांदेड या ठिकाणी दिनांक २१/९/२०२३ या दिवशी जन्म झाला असून, जन्म प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणेसाठी सदर कार्यालयात दिनांक १३/३/२०२६ रोजी तहसील कार्यालय नांदेड येथे अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांच्या आत आपला लेखी आक्षेप या तहसील कार्यालय नांदेड येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक–२२/४/२०२६, स्थळ–नांदेड

**तहसीलदार नांदेडकरिता**




**जाहीर प्रगटन**

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उद्योगनगर सहकारी भाडेकरू मालकी गृहनिर्माण संस्था मर्यादित नांदेड मधील प्लॉट क्र. ७० ए श्री चंद्रकांत यादव व्यवहारे यांचा असून, प्लॉटची चतुःसीमा अशी–

पूर्वेस– प्लॉट क्र. ६९, पश्चिमेस–प्लॉट क्र. ७० बी

दक्षिणेस–प्लॉट क्र. ४९, उत्तरेस–रोड असून, या प्लॉटमधील अर्धा भाग ७० ए माधव सुभाष दाचावार व जाधव विजय शरदचंद्र यांनी विकत घेण्याचे ठरले असून, या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या प्लॉट प्रकरणी कोणाची हरकत असल्यास संबंधितांनी लेखी आक्षेप उद्योगनगर सहकारी भाडेकरू मालकी गृहनिर्माण संस्था मर्यादित नांदेड या संस्थेचे अध्यक्ष/सचिव यांचेकडे पुराव्यासह १५ दिवसांच्या आत तक्रार नोंदवावी. या कालावधीत आक्षेप आला नाही तर कोणाचाही आखेप अथवा हरकत नाही असे गृहीत धरून सदरील प्लॉट ७० ए माधव सुभाष दाचावर व जाधव विजय शरदचंद्र यांच्या नावे हस्तांतर करण्यात येईल असे जाहीर करण्यात येत आहे. करिता जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

जाहीर प्रगटन देणार
अध्यक्ष/सचिव
उद्योगनगर सहकारी भाडेकरू मालकी
गृहनिर्माण संस्था मर्यादित नांदेड
तथा लक्ष्मी सदन, कोसबतवार कॉम्पलेक्स शिवाजीनगर, नांदेड


भारत सरकार
महाराष्ट्र शासन
सोमनाथ
सोमलिङ्गं नरो दृष्ट्वा सर्वपापैः प्रमुच्यते।
लभते फलं मनोवाञ्छितं मृतः स्वर्गं समाश्रयेत्॥
सोमनाथ
७५ वर्षे गौरवशाली वारशाची
सोमनाथ हे भारताच्या समृद्ध संस्कृतीचे प्रतीक आहे. हजारो वर्षांपासून विध्वंसक आक्रमणांना सामोरे जाऊनही सोमनाथ आजही आपल्या अभिमान आणि शौर्याचे प्रतीक म्हणून अढळपणे उभे आहे.
७५ वर्षांपूर्वी लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दृढ संकल्पामुळे आधुनिक सोमनाथाच्या पुनरुत्थानाचा मार्ग सुरळीत झाला. आज प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली ही पवित्र भूमी भारताच्या सांस्कृतिक पुनर्जागरणाची गौरवशाली साक्ष देत आहे.
या सुवर्णमयी ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार व्हा!
मुख्य उपक्रम
कलश यात्रा | भजन संध्या | ओंकार मंत्राचे सामूहिक जप
सोमनाथ पुस्तिकेमध्ये मंत्र लेखन | सोमनाथाशी संबंधित कथांचे कथन
श्री सोमनाथ मंदिर परिसर, प्रभास पाटण | ८ ते ११ मे, २०२६
“सोमनाथ ही अशी यशोगाथा आहे जी आपल्याला शिकवते की सृजनाची शक्ती ही विध्वंसाच्या शक्तीपेक्षा कितीतरी अधिक महान असते.”
प्रधानमंत्री श्री.नरेंद्र मोदी (अध्यक्ष, श्री सोमनाथ ट्रस्ट)
लोकराज्य
देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री
एकनाथ शिंदे
उपमुख्यमंत्री
सुनेत्रा अजित पवार
उपमुख्यमंत्री
सोमनाथच्या गौरवशाली १००० वर्षांचा वारसा अधिक समृद्ध करण्यासाठी योगदान द्या.
येथे स्कॅन करा